


# हॅलो प्रभात

PRGI NO.MAHMAR/25/A3118

■ संपादक : संजीव शाळगावकर   पुणे आवृत्ती

■ मुंबई ■ अहिल्यानगर ■ कोल्हापूर ■ सातारा ■ सांगली

पुणे ■ वर्ष : ०१ ■ अंक : १५८ ■ शनिवार, ०९ मे २०२६ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४



**भाड्याने देणे**

ऑफिससाठी उपयुक्त असा २५० स्के.फू.ब्लॉक भाड्याने देणे आहे.

•इंडोशिवा ॲसेट•

दुसरा मजला, गणपती मंदिरसमोर विश्रामबाग, सांगली.

संपर्क

7517219001

9011889001


# जलसंधारणाची कामे युद्धपातळीवर पूर्ण करा

## मुख्यमंत्री फडणवीस : भूजल पातळी वाढविण्यासाठी कामे करण्याचे निर्देश

**मुंबई : हॅलो प्रभात**

एल निनोच्या पार्श्वभूमीवर जलसंधारण तसेच जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गतची कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्यात यावीत. तसेच भूजल पातळी कमी झालेल्या ठिकाणी प्राधान्याने कामे करून तेथील भूजल पातळी वाढविण्यासाठी प्रयत्न करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी वर्षा या शासकीय निवासस्थानी मृद व जलसंधारण विभागाचा आढावा घेतला. यावेळी मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, मुख्यमंत्र्यांचे जल -विषयक सल्लागार श्रीराम वेदिरे, विशेष कार्य अधिकारी प्रिया खान, मृद व जलसंधारण आयुक्त अंजली रमेश, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजय देवराज आदी यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, एल निनोच्या पार्श्वभूमीवर भूजल पातळी वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी जलसंधारण, जलयुक्त शिवारमधील कामांचे प्राधान्य ठरवून ती पूर्ण करण्यात यावीत. तसेच जलयुक्त शिवार २.० अंतर्गत समाविष्ट गावांमध्ये दुरुस्तींच्या कामांची निकड पाहून ही कामे आराखड्यात समाविष्ट करून तातडीने पूर्ण करावीत. जलयुक्तमधील राज्यस्तरीय आराखडे १५ मे पूर्वी मंजूर करण्यात यावेत. तसेच जिल्ह्यांना सुधारित आराखडे देऊन कामांना गती द्यावी. जलयुक्त शिवारची कामे हाती घेतलेल्या गावांबाहेरील १० टक्के कामेही प्राधान्यक्रम ठरवून हाती घेण्यात यावीत.

केंद्र शासनाच्या 'विकसित भारत जी राम जी' योजनेमध्ये जलसंधारणाच्या कामांवर भर देण्यात आला आहे. त्याचा लाभ घेऊन राज्यातील जलसंधारणाची कामे पूर्ण करून घ्यावीत. जलसंधारण कामाअंतर्गत नालाखोलीकरणची कामे करताना त्याठिकाणी





पुन्हा गाळ होऊ नये, यासाठी नाल्याच्या ठिकाणी बांबू लागवड करण्याचा विचार करावा. विदर्भातील मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीची कामे जून महिन्यात पूर्ण करण्याचे नियोजन करावे. प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेअंतर्गत वाढीव निधी मिळण्यासाठी केंद्रीय मंत्री यांना स्वतः भेटणार असल्याचेही मुख्यमंत्री यांनी यावेळी सांगितले.

मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड म्हणाले की, मृद व जलसंधारण विभागाच्या आकृतीबंधाला मंजुरी मिळाल्याने आता कामास गती येईल. आतापर्यंत मंजुरी दिलेली कामे पूर्ण करण्यावर भर देण्यात येत आहे. तसेच मूळ आराखड्यानुसारच कामे पूर्ण व्हावीत यासाठी मार्गदर्शक सूचना तयार केल्या आहेत. मालगुजारी तलावांच्या ठिकाणी असलेली अतिक्रमणे काढण्याची परवानगी मिळावी.

सचिव पापळकर यांनी सांगितले की, जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत विशेष निधी व अभिसरणअंतर्गत आतापर्यंत गाव आराखड्याप्रमाणे १ लाख ४४ हजार ६९७ कामे मंजूर झाली आहेत. त्यापैकी १ लाख १० हजार १२० कामे पूर्ण झाली आहेत. ऊर्वरित कामे प्रगतीपथावर असून लवकरात लवकर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

एल निनोच्या पार्श्वभूमीवर टँकरग्रस्त आणि भूजल पातळी खालावलेल्या गावांमध्ये प्राधान्याने कामे हाती घेण्यात आली आहेत. तसेच विविध योजनाअंतर्गत पाणलोट क्षेत्रात झालेल्या मृद व जलसंधारण कामांची प्रत्यक्ष स्थळ पडताळणी करण्याचे काम सुरू असून आतापर्यंत १५ लाख १५ हजार कामांपैकी १२ लाख २७ हजार संरचनांची प्रत्यक्ष स्थळ पडताळणी झाली आहे.गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार अंतर्गत यावर्षी १४३५ जलसाठ्यातून ४७७.७३ लक्ष घनमीटर गाळ काढण्यात आला आहे. त्यामुळे ३०८३५ सघमी पाणीसाठा पुनर्स्थापित झाला असून ७३ हजार ४१७ एकर क्षेत्र सुपिक झाले आहे. या वर्षी १५ जून पर्यंत जिल्हानिहाय गाळ काढण्याचे नियोजन करण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले.

प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेअंतर्गत आतापर्यंत २२ हजार कामे पूर्ण झाली असून त्यांचे जिओ टॅगिंग करण्यात आले आहे. तसेच पाणलोट विकास घटकांतर्गत ५७ अमृत सरोवर तयार करण्यात येत असून १५ जूनपर्यंत ३१ अमृत सरोवर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. विभागाच्या पाच वर्षांच्या बृहद आराखड्याअंतर्गत राज्यातील २७ हजार ९४२ सूक्ष्म पाणलोटांमध्ये १ लाख २१ हजार ५८३ कामे प्रस्तावित करण्यात आली असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

## संक्षिप्त...

### पन्हाळगडावरील अतिक्रमणावर हातोडा

**पन्हाळा : हॅलो प्रभात**

ऐतिहासिक पन्हाळगडावरील हजरत पीर शहादुद्दीन खतावली दर्गा (सादोबा दर्गा) परिसरातील अनधिकृत बांधकामाचा प्रश्न आता निर्णायक वळणावर पोहोचला आहे. शनिवारी (दि.९) प्रशासनाकडून मोठी अतिक्रमण विरोधी मोहीम राबवण्यात येणार आहे. या कारवाईच्या पार्श्वभूमीवर पन्हाळगडावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी कोल्हापूर जिल्हा प्रशासनाने संपूर्ण गड परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

### वृद्धाने डोंगर फोडून भाविकांसाठी केला रस्ता

**सातारा : हॅलो प्रभात**

कठोर परिश्रम, अथक कष्ट, अविश्रांत मेहनत, अपार इच्छाशक्ती अन् दुर्दम्य आशावाद यातून ६७ वर्षांच्या एका वृद्धाने स्वतःच्या श्रमदानाने डोंगर खोदून आठ वर्षांपासून शंभू महादेवाच्या भक्तांसाठी साडेतीन किलोमीटरचा रस्ता तयार केला आहे. त्यांच्या या अनोख्या तपश्चर्येतून त्यांची ही यशोगाथा फळाला आली आहे.

### झेडपीच्या विनंती बदल्या पुढे ढकलल्या



**सोलापूर : हॅलो प्रभात**

जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय व विनंती बदल्या काही दिवसांसाठी पुढे गेल्या आहेत. बदल्यावेळी कुणाच्या बदल्या होणार अन् कोण मुख्यालयात ठाण मांडून राहणार याच्या चर्चा जिल्हा परिषदेच्या मुख्यालयात होत आहेत.

# कोल्हापुरात महिलांसाठी अत्याधुनिक स्वच्छतागृहांची सुविधा

## खासबाग मैदान व ताराबाई पार्क येथील स्वच्छतागृहांचे रविवारी लोकार्पण

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

महिला भाविक, पर्यटक आणि नागरिकांसाठी कोल्हापूर शहरात उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक महिला स्वच्छतागृहांचे लोकार्पण रविवारी (१० मे) होणार आहे. शहरातील खासबाग मैदान चौक आणि ताराबाई पार्क परिसरात वातानुकूलित व सर्व सुविधांनी सुसज्ज अशी महिला स्वच्छतागृहे उभारण्यात आली असून, या कामाची पाहणी भाजपा युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी केली.

साडेतीन शक्तीपीठांपैकी एक असलेल्या महालक्ष्मी मंदीर येथे दर्शनासाठी तसेच पन्हाळा किल्ला आणि ज्योतिबा देवस्थान येथे पर्यटन व दर्शनासाठी दररोज हजारो भाविक कोल्हापुरात येत असतात. मात्र, महिलांसाठी सार्वजनिक स्वच्छतागृहांची सुविधा नसल्याने अनेकदा गैरसोयीचा सामना करावा लागत होता. महापालिकेत महायुतीची सत्ता आल्यानंतर महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह उभारण्याचा विषय पुन्हा ऐरणीवर आला. तब्बल २५ वर्षांपासून प्रलंबित असलेली



● कृष्णराज महाडिक यांची पाहणी

मागणी पूर्ण करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी व महापालिकेच्या माध्यमातून कृष्णराज महाडिक यांनी पाठपुरावा केला. त्यानंतर राज्य शासनाकडून निधी उपलब्ध झाल्याने खासबाग मैदान चौक व ताराबाई पार्क येथील एसटी कार्यशाळेबाहेरील जागेत स्वच्छतागृह उभारणीस सुरुवात झाली. अवघ्या दोन महिन्यांत ही स्वच्छतागृहे पूर्ण झाली असून महिलांसाठी आवश्यक त्या सर्व सुविधा येथे उपलब्ध करण्यात आल्या आहेत. या स्वच्छतागृहांचे लोकार्पण पालकमंत्री प्रकाश आबिटकर, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील, खासदार धनंजय महाडिक, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, आमदार राजेश क्षीरसागर, आमदार अमल महाडिक, महापौर रूपाराणी निकम आदी मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. रविवारी सकाळी ९.३० वाजता खासबाग मैदान येथे तर सकाळी १०.३० वाजता ताराबाई पार्क परिसरातील आरटीओ कार्यालयाजवळ लोकार्पण सोहळा पार पडणार आहे. यावेळी भाजप युवा मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

# सातारा जिल्ह्याचा दहावीचा निकाल ९५.७१ टक्के

**सातारा : हॅलो प्रभात**





महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्या कोल्हापूर विभागीय मंडळ तर्फे घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) फेब्रुवारी-मार्च २०२६ परीक्षेचा निकाल शुक्रवारी (दि. ८) जाहीर करण्यात आला. सातारा जिल्ह्याचा एकूण निकाल ९५.७१ टक्के लागला असून गतवर्षीच्या ९६.७५ टयांच्या तुलनेत यंदा १.०४ टयांनी घट झाली आहे.

दहावी परिक्षेसाठी जिल्ह्यातून नियमित प्रवर्गातील ३६ हजार ५०८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ३६ हजार ४१२ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले होते. यामधून ३४ हजार ८५० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. निकालात मुलींनी पुन्हा एकदा बाजी मारली असून मुलींचा निकाल ९७.२५ टक्के तर मुलांचा निकाल ९४.३१ टक्के लागला आहे. जिल्ह्यातील १७ हजार ३१७ मुलींपैकी १६ हजार ८४१ मुली उत्तीर्ण झाल्या, तर १९ हजार ९५ मुलांपैकी १८ हजार ९ मुले उत्तीर्ण झाली आहेत.

दरम्यान, पुनर्प्रविष्ट (रिपीटर) विद्यार्थ्यांचा निकाल मात्र समाधानकारक राहिला नाही. जिल्ह्यातील ७२० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ७०४ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. यातून केवळ २७२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून निकालाची टक्केवारी ३८.६३ इतकी राहिली आहे. कोल्हापूर विभागीय मंडळात सातारा, सांगली आणि कोल्हापूर या तीन जिल्ह्यांचा समावेश असून विभागाचा एकूण निकाल ९५.४७ टक्के लागला आहे. विभागात कोल्हापूर जिल्ह्याने ९६.६७ टयांसह अव्वल स्थान पटकावले असून सातारा दुसऱ्या क्रमांकावर राहिला आहे. सांगली जिल्ह्याचा निकाल ९३.५६ टक्के लागला.

यंदाच्या परीक्षेसाठी सर्व परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही यंत्रणा अनिवार्य करण्यात आली होती. कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे राबविल्यामुळे निकालात काहीशी घट झाल्याचे मंडळाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. सातारा जिल्ह्यातील ११६परीक्षा केंद्रांपैकी ११५ केंद्रांवर सीसीटीव्ही सुविधा उपलब्ध होती.

# चिंचबाग मैदान परिसरात स्वच्छता अभियानाचे आयोजन

**सांगलीवाडी : हॅलो प्रभात**

येथील चिंचबाग मैदान परिसर स्वच्छ, सुंदर व निरोगी ठेवण्यासाठी महानगरपालिका कर्मचारी, स्वच्छता कर्मचारी, स्थानिक क्रिकेट खेळाडू, योगा ग्रुप तसेच रोज व्यायाम करणारे नागरिक यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे.

हे अभियान रविवार, दिनांक १० मे रोजी सकाळी ७.०० वाजता चिंचबाग मैदान येथे होणार आहे. 'स्वच्छ मैदान-सुंदर सांगलीवाडी' हा संकल्प घेऊन परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

आपल्या रोजच्या वापरातील मैदानाची स्वच्छता राखणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे. त्यामुळे क्रिकेट खेळाडू, योगा ग्रुप सदस्य आणि सर्व नागरिकांनी महानगरपालिका कर्मचाऱ्यांसोबत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या उपक्रमाचे आवाहन नगरसेवक अभिजित कोळी, नगरसेविका दिपाली पाटील आणि नगरसेविका अश्विनी कदम यांनी केले आहे.

# कुरणेवाडी दरोड्यातील टोळी जेरबंद

**म्हसवड : हॅलो प्रभात**

कुरणेवाडी येथील दरोड्याच्या गुन्ह्यातील सात संशयितांना अवघ्या ४८ तासांत म्हसवड पोलिस व स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या (एलसीबी) पथकाने जेरबंद केले. दादा आण्णा बुधावले (वय २०), संजय आण्णा बुधावले (वय २३), महादेव आण्णा बुधावले (वय २२), हर्षद युवराज बुधावले (वय १९), ऋतिक भारत बनसोडे (वय २०) व दोन विधी संघर्षग्रस्त बालक सर्व (सर्व रा. वरकुटे मलवडी ता. माण जि. सातारा) अशी संशयीतांची नावे आहेत.

# पंचगंगा नदी प्रदूषणाविरोधात आ.यड्रावकर यांना निवेदन

**जयसिंगपूर : हॅलो प्रभात**

पंचगंगा नदीचे वाढते प्रदूषण, नदीपात्रात मिसळणारे सांडपाणी आणि रासायनिकयुक्त पाण्यामुळे निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीबाबत आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर यांना निवेदन देण्यात आले. पंचायत समितीचे सभापती मिलिंद कुरणे व माजी उपसभापती विद्याधर कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत हे निवेदन देण्यात आले.

यावेळी आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी पंचगंगा नदी प्रदूषणाचा प्रश्न अत्यंत गंभीर असून याबाबत पर्यावरण मंत्री नामदार पंकजा मुंडे यांची भेट घेऊन या प्रश्नाची तीव्रता त्यांच्या निदर्शनास आणून देणार असल्याचे



सांगितले. तसेच येणाऱ्या अधिवेशनात पंचगंगा प्रदूषणाबाबत लक्षवेधी मांडून सरकारचे लक्ष वेधणार असून तातडीने उपाययोजना करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

निवेदनात म्हटले आहे की, पंचगंगा नदीचे पाणी मोठ्या प्रमाणात सांडपाणी व केमिकलयुक्त पाण्यामुळे दूषित झाले असून हे पाणी आता पिण्यासाठीच नव्हे तर शेतीसाठीसुद्धा अयोग्य ठरत आहे. त्यामुळे या गंभीर प्रश्नाकडे शासनाने तातडीने लक्ष देऊन कोणत्याही घटकावर अन्याय होणार नाही याची दक्षता घ्यावी, अशी मागणी करण्यात आली.

तसेच पंचगंगेचे पाणी सतत वाहते ठेवावे, गावागावांत तसेच शहरी भागात एसटीपी प्लँट उभारण्यासाठी शासनाने निधी व जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली. नदीकाठावरील पाणी उपसा करणारे शेतकरी व पाणीपुरवठा संस्थांना दूषित पाणी उपसा करावे लागत असल्याने त्यांचे वीजबिल तसेच पाटबंधारे विभागाकडून आकारला जाणारा उपसा कर माफ करावा, अशीही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी हेरवाडच्या सरपंच रेखा जाधव, बंडू बरगाले, संतोष चिंदरकर, अमित कागले, आदिनाथ आरबाळे, संदीप बिंदगे, अभिजित पाटील आदी उपस्थित होते.




## दिल्लीच्या मोहात प्रादेशिक नेत्यांचे राजकीय अस्तित्व धोक्यात



भारतीय राजकारणात 'तिसरी आघाडी' हा शब्द नवीन नाही. काँग्रेस आणि भाजप या दोन राष्ट्रीय पक्षांच्या पलीकडे जाऊन प्रादेशिक शक्तींनी राष्ट्रीय पर्याय उभा करण्याचे अनेक प्रयोग झाले. काही काळासाठी या प्रयोगांना यशही मिळाले. मात्र, गेल्या दशकातील राजकीय घडामोडी पाहिल्या तर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवतेड्डदिल्लीच्या सत्तेच्या मोहात अडकलेल्या अनेक प्रादेशिक नेत्यांनी आपल्या स्वतःच्या राज्यातील राजकीय पाया कमकुवत करून घेतला आहे. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी, तेलंगणात केसीआर, महाराष्ट्रात शरद पवार, दिल्लीत अरविंद केजरीवाल आणि आंध्र प्रदेशात चंद्रबाबू नायडू यांची राजकीय वाटचाल याचे जिवंत उदाहरण ठरत आहे. एकेकाळी पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांचे वर्चस्व अभेद्य मानले जात होते. डाव्या आघाडीचा दीर्घकाळाचा किल्ला उद्धवस्त करून त्यांनी बंगालमध्ये आपले स्वतंत्र साम्राज्य उभे केले. २०२१ मधील प्रचंड विजयानंतर त्यांनी स्वतःला पंतप्रधान नरेंद्र मोदींना पर्याय म्हणून सादर करण्याचा प्रयत्न केला. गोवा, त्रिपुरा, मेघालय यांसारख्या राज्यांत तृणमूल काँग्रेसचा विस्तार करण्यासाठी त्यांनी मोठी राजकीय ऊर्जा खर्च केली. 'खेला होबे'चा नारा बंगालबाहेर नेण्याचा प्रयत्न झाला. परंतु राष्ट्रीय विस्ताराच्या या धडपडीत बंगालमधील संघटनात्मक पकड सैल झाली आणि त्याची मोठी किंमत त्यांना मोजावी लागली. याच धर्तीवर तेलंगणातील के. चंद्रशेखर राव यांची कहाणीही लक्षवेधी आहे. तेलंगणाच्या निर्मितीनंतर त्यांनी राज्यात मजबूत नेतृत्व उभे केले होते. मात्र, राष्ट्रीय महत्त्वाकांक्षा बाळगत त्यांनी टीआरएसचे रूपांतर बीआरएसमध्ये केले आणि देशभर तिसरी आघाडी उभारण्याच्या मोहिमेला सुरुवात केली. पाटणा, लखनौ, चेन्नई, कोलकाता येथे बैठका घेऊन विरोधी पक्षांना एकत्र आणण्याचा प्रयत्न झाला. परंतु दिल्लीच्या राजकारणात स्थान निर्माण करण्याच्या ध्यासात त्यांनी तेलंगणातील जनतेच्या बदलत्या भावना ओळखल्या नाहीत. परिणामी, काँग्रेसने त्यांच्या दशकभराच्या सत्तेला धक्का देत त्यांचा पराभव केला. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्रबाबू नायडू यांनाही अशीच राजकीय किंमत चुकवावी लागली. २०१९ च्या निवडणुकांपूर्वी त्यांनी भाजपपासून फारकत घेत तिसऱ्या आघाडीच्या प्रयत्नांत स्वतःला झोकून दिले. विविध विरोधी पक्षांच्या मंचावर त्यांची उपस्थिती वाढली. ते स्वतःला राष्ट्रीय राजकारणातील मध्यस्थ म्हणून प्रस्थापित करू पाहत होते. पण या प्रयत्नांत त्यांचे स्वतःच्या राज्यावरील लक्ष कमी झाले आणि जगनमोहन रेड्डी यांनी त्यांना जबरदस्त धक्का दिला. नंतर २०२४ मध्ये एनडीएमध्ये परत येऊन त्यांनी राजकीय पुनरागमन केले असले, तरी 'तिसऱ्या आघाडी'चे स्वप्न त्यांच्या राजकीय कारकिर्दीतील सर्वात मोठी चूक ठरल्याचे स्पष्ट दिसते. महाराष्ट्रातील शरद पवार हे भारतीय राजकारणातील अत्यंत अनुभवी नेते मानले जातात. अनेक दशकांपासून त्यांनी विविध प्रादेशिक पक्षांना एकत्र आणून राष्ट्रीय पर्याय उभा करण्याचा प्रयत्न केला. महाविकास आघाडीचा प्रयोगही त्याचाच भाग होता. मात्र, राष्ट्रीय स्तरावर स्वतःचे महत्त्व वाढवण्याच्या प्रयत्नात त्यांच्या पक्षातच फूट पडली. अजित पवारांच्या बंडामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे विभाजन झाले आणि शरद पवारांना आपल्या राजकीय वारशासाठी संघर्ष करावा लागला. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनीही पंजाबमधील यशानंतर गुजरात, गोवा यांसारख्या राज्यांत विस्ताराचे प्रयत्न केले. 'दिल्ली मॉडेल' राष्ट्रीय स्तरावर मांडण्याचा प्रयत्न झाला. मात्र, राष्ट्रीय विस्ताराच्या या राजकारणात त्यांचा मूळ बालेकिल्लाच डळमळीत झाला. पक्षांतर्गत मतभेद, नेतृत्वावरील प्रश्न आणि संघटनात्मक आव्हाने यामुळे आम आदमी पक्षालाही अडचणींचा सामना करावा लागत आहे.या सर्व घटनांमधून एक समान धागा स्पष्ट दिसतो, प्रादेशिक नेत्यांची राष्ट्रीय महत्त्वाकांक्षा त्यांच्या स्वतःच्या राज्यांतील राजकीय पकडीवर परिणाम करत आहे. 'तिसरी आघाडी' या संकल्पनेत वैचारिक एकात्मतेपेक्षा पंतप्रधानपदाच्या आकांक्षा अधिक दिसतात. प्रत्येक नेता स्वतःला राष्ट्रीय पर्याय म्हणून पाहतो; पण दुसऱ्याचे नेतृत्व स्वीकारण्यास तयार नसतो. परिणामी, ही आघाडी निव्वळ राजकीय समीकरणांपुरती मर्यादित राहते. १९९० च्या दशकात तिसऱ्या आघाडीचे प्रयोग यशस्वी झाले कारण त्या काळात काँग्रेस आणि भाजप दोन्ही तुलनेने कमकुवत होते. आजची परिस्थिती वेगळी आहे. भाजप हा संघटनात्मकदृष्ट्या अत्यंत मजबूत आणि शिस्तबद्ध पक्ष म्हणून उभा राहिला आहे. त्यामुळे अस्थिर आणि व्यक्तिकेंद्री आघाड्यांना दीर्घकाळ टिकून राहणे कठीण होत आहे. भारतीय राजकारण हळूहळू द्विध्रुवीय स्वरूपाकडे,एनडीए विरुद्ध विरोधी पक्ष,वाटचाल करत आहे. आजच्या घडीला प्रादेशिक नेत्यांसमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे आपल्या राज्यातील जनाधार टिकवून ठेवणे. दिल्लीचे स्वप्न पाहताना त्यांनी आपल्या बालेकिल्ल्यांकडे दुर्लक्ष केले, तर त्यांची राजकीय जमीन सरकू शकते, हे अलीकडच्या घटनांनी सिद्ध केले आहे. राष्ट्रीय राजकारणात प्रभाव निर्माण करण्यासाठी प्रथम स्वतःचे राज्य भक्कम ठेवणे आवश्यक असते. अन्यथा 'तिसरी आघाडी'चे मृगजळ त्यांच्या राजकीय अस्तित्वालाच गिळंकृत करू शकते.

# ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी डिप्लोमा शिक्षण - करिअरची संधी

**दै. हॅलो प्रभात**

आजचे युग हे तंत्रज्ञान, कौशल्य आणि स्पर्धेचे युग आहे. या बदलत्या काळात योग्य शिक्षणाची निवड करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी करिअरची दिशा ठरवताना अनेक अडचणी निर्माण होतात. आर्थिक मर्यादा, माहितीचा अभाव आणि योग्य मार्गदर्शनाची कमतरता यामुळे अनेक विद्यार्थी चांगल्या संधींपासून वंचित राहतात. अशा परिस्थितीत दहावी नंतरचे डिप्लोमा शिक्षण हे ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी एक उत्तम, परवडणारे आणि करिअर घडवणारे माध्यम ठरत आहे.



डिप्लोमा म्हणजे तांत्रिक शिक्षणाचा असा प्रकार जो विद्यार्थ्यांना अल्प कालावधीत व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करण्यास सक्षम बनवतो. सिव्हिल, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, कॉम्प्युटर, आर्टिफिशियल एंड मशिन लर्निंग, इलेक्ट्रॉनिक्स अशा विविध शाखांमध्ये उपलब्ध असलेले हे शिक्षण विद्यार्थ्यांना थेट उद्योगक्षेत्राशी जोडते. डिप्लोमा शिक्षणाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे प्रात्यक्षिकावर आधारित अभ्यासक्रम. त्यामुळे विद्यार्थी केवळ सैद्धांतिक ज्ञानावर न राहता प्रत्यक्ष काम करण्यासाठी तयार होतात.

ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी डिप्लोमा शिक्षणाचा सर्वात मोठा फायदा म्हणजे त्याची परवडणारी फी आणि कमी कालावधी. अनेक कुटुंबांना दीर्घकालीन व खर्चिक शिक्षण परवडत नाही. अशा वेळी डिप्लोमा हा योग्य पर्याय ठरतो. शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांमुळे विद्यार्थ्यांना आर्थिक मदत मिळते, ज्यामुळे शिक्षणाचा भार कमी होतो.

डिप्लोमा पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना विविध उद्योगांमध्ये नोकरीच्या चांगल्या संधी उपलब्ध होतात. तंत्रज्ञ, सुपरवायझर, ऑपरेटर अशा पदांवर विद्यार्थी काम करू शकतात. अनेक महाविद्यालयांमध्ये कॅम्पस प्लेसमेंटची सुविधा उपलब्ध असल्यामुळे विद्यार्थ्यांना थेट कंपन्यांमध्ये संधी मिळते. याशिवाय, डिप्लोमा पूर्ण केल्यानंतर इंजिनिअरिंगच्या दुसऱ्या वर्षात थेट प्रवेश मिळतो, ज्यामुळे उच्च शिक्षणाचं दालन खुले राहतात.

आजच्या काळात ग्रामीण भागातही डिप्लोमा शिक्षणासाठी अत्याधुनिक व उत्कृष्ट महाविद्यालयांची उभारणी झाली आहे, ही अत्यंत समाधानाची बाब आहे. अशाच गुणवत्तापूर्ण शिक्षणाची दिशा देणाऱ्या संस्थांमध्ये आदर्श इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च सेंटर विटा या महाविद्यालयाचा उल्लेख अग्रक्रमाने करता येईल. संस्थेचे संस्थापक अँड सदाशिवराव भाऊ पाटील यांनी पुण्या मुंबई सारख्या शहरात जशी महाविद्यालय आहेत तसेच हुबेहूब महाविद्यालय विटा परिसरात उभारले आहे संस्थेचे अध्यक्ष अँड वैभव दादा पाटील यांनी आद्यावत सुख सुविधा सुसज्ज प्रयोगशाळा, डिजिटल क्लासरूम, समृद्ध ग्रंथालय, तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या सर्व आधुनिक सुविधा उपलब्ध करून परिसरातील विद्यार्थ्यांना बदलत्या परिस्थितीनुसार व्यावसायीक शिक्षणाची संधी निर्माण केली आहे. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी सुरक्षित व नियमित बस व्यवस्था असून, दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनाही शिक्षणाची संधी सुलभ झाली आहे.

यामध्ये मुलींच्या शिक्षणाला विशेष प्राधान्य देण्यात आलेले आहे. ग्रामीण भागातील मुलींना आपल्या गावाजवळच सुरक्षित, गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी अनेक महाविद्यालयांनी स्वतंत्र व सुरक्षित महिला वसतिगृहाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. तसेच, खास मुलींसाठी सुरक्षित प्रवास व्यवस्था, महिला देखरेखीखालील वसतिगृह, आणि आवश्यक त्या सर्व सुविधा देऊन पालकांचा विश्वास जिंकण्याचा प्रयत्न केला जात आहे.

या सर्व सोयी-सुविधांमुळे ग्रामीण भागातील मुलींना आता शिक्षणासाठी दूर शहरात जाण्याची गरज उरलेली नाही. त्या आपल्या परिसरातच आत्मविश्वासाने शिक्षण घेऊन आपले करिअर घडवू शकतात. त्यामुळेच आज डिप्लोमा शिक्षण हे ग्रामीण मुलींसाठी सशक्तीकरणाचे प्रभावी साधन ठरत आहे.

याशिवाय, डिप्लोमा शिक्षणामुळे स्वरोजगाराच्या संधी देखील उपलब्ध होतात. विद्यार्थी स्वतःचे छोटे उद्योग, सर्व्हिस सेंटर, वर्कशॉप किंवा तांत्रिक व्यवसाय सुरू करू शकतात. त्यामुळे ते केवळ नोकरी शोधणारे न राहता, इतरांना रोजगार देणारे बनू शकतात. आज 'स्किल इंडिया' आणि 'मेक इन इंडिया' सारख्या उपक्रमांमुळे तांत्रिक कौशल्य असलेल्या तरुणांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे डिप्लोमा धारकांसाठी भविष्यातील संधी अधिक व्यापक आहेत. शेवटी असे म्हणता येईल की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी योग्य माहिती, योग्य मार्गदर्शन आणि आत्मविश्वासाच्या जोरावर डिप्लोमा शिक्षणाची निवड केली, तर त्यांचे भविष्य नक्कीच उज्ज्वल होऊ शकते.

'डिप्लोमा शिक्षण हे केवळ करिअरची संधी नाही, तर ग्रामीण विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना नवी दिशा देणारे एक शक्तिशाली माध्यम आहे.' आज आदर्श इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून सन २००८ पासून हजारो अभियंते घडवून शासकीय निमशासकीय कार्यालयात मोठ्या हुद्द्यावर कार्यरत आहेत तर काही विद्यार्थी भारत देशाच्या बाहेर उच्च पगाराची नोकरी मिळवून उच्च स्थानावर आहेत म्हणून च आजच्या तंत्रज्ञानाच्या काळात व्यवसायीक शिक्षण हे वाघीणीच्या दुधाप्रमाणे आहे जे जे हे शिक्षण घेतील ते भविष्यात उच्च स्थानावर नक्कीच असतील त्यामुळे आजच्या दहावीच्या विद्यार्थ्यांनी डिप्लोमा अभ्यासक्रमांचा विचार करावा.

• प्रा.प्रदीप शिंदे
विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता
आदर्श इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी
ॲण्ड रिसर्च सेंटर,विटा



## मदर्स डे निमित्त 'द बॉडी शॉप'कडून नवी सौंदर्य उत्पादनांची श्रेणी

**मुंबई : हॅलो प्रभात**



मदर्स डेच्या निमित्ताने सौंदर्यप्रसाधन क्षेत्रातील आघाडीचा ब्रँड 'द बॉडी शॉप'ने 'व्हाईट टी अँड एल्डरफ्लॉवर' ही मर्यादित आवृत्तीतील स्नान व शरीरसौंदर्य उत्पादनांची नवी श्रेणी सादर केली आहे. दैनंदिन स्व-देखभालीला विशेष अनुभव देण्याच्या उद्देशाने ही उत्पादने बाजारात आणण्यात आली आहेत. या श्रेणीत हलका आणि ताजेतवाना सुगंध असून त्यात व्हाईट टी, एल्डरफ्लॉवर, काकडी, सफरचंद, सिडरवुड आणि मस्क यांचा समावेश आहे. उन्हाळ्यातील वापरासाठी ही उत्पादने विशेष उपयुक्त असल्याचे कंपनीने म्हटले आहे. या नव्या श्रेणीत स्नान जेल, बॉडी बटर, बॉडी योगर्ट, हँड क्रीम आणि सुगंधी मिस्ट अशा विविध उत्पादनांचा समावेश आहे.

## झी ५वर 'तिघी'चा वर्ल्ड डिजिटल प्रीमियर

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**




मराठी चित्रपट 'तिघी' आता १५ मे २०२६ रोजी झी५वर वर्ल्ड डिजिटल प्रीमियरद्वारे प्रदर्शित होणार आहे. दिग्दर्शिका जीजिवीशा काळे यांच्या दिग्दर्शनातील हा पहिला चित्रपट असून कौटुंबिक नातेसंबंधांतील गुंतागुंत आणि भावनिक संघर्ष यांची प्रभावी मांडणी यात करण्यात आली आहे. चित्रपटात भारती आचरेकर, नेहा पेंडसे बायस, सोनाली कुलकर्णी, निपुण धर्माधिकारी, जैमिनी पाठक, पुष्कराज चिरपुटकर, सुव्रत जोशी, मृण्मयी गोडबोले आणि संजय मोने यांच्या प्रमुख भूमिका आहेत. प्रभावी अभिनय आणि संवेदनशील कथानकामुळे 'तिघी' प्रेक्षकांसाठी एक खास अनुभव ठरणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## मुंबईत 'किया व्हायब स्टुडिओ'चे सादरीकरण

**मुंबई : हॅलो प्रभात**

किया इंडियाने मुंबईत 'किया व्हायब स्टुडिओ' या विशेष सांस्कृतिक उपक्रमाचे सादरीकरण केले आहे. तरुणांमधील सर्जनशीलता आणि अभिव्यक्तीला प्रोत्साहन देण्यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. ९ आणि १० मे रोजी मालाड येथील इनऑर्बिट मॉलमध्ये होणाऱ्या 'हायब इंडिया पॉप-अप पार्क'मध्ये हा अनुभव घेता येणार आहे. येथे संगीत, थेट सादरीकरणे आणि विविध संवादात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे 'किया व्हायब स्टुडिओ'. २०२६ किया सिरॉस कारमध्ये तयार करण्यात आलेल्या या स्टुडिओमधून अभ्यागतांना उच्च दर्जाचे व्हिडिओ रेकॉर्ड करून शेअर करण्याची संधी मिळणार आहे.

## एअरटेलचे 'सिक्युअर वर्कफोर्स' सादर; उद्योगांसाठी सायबर सुरक्षेचे नवे समाधान

**नवी दिल्ली : हॅलो प्रभात न्यूज नेटवर्क**

वाढत्या सायबर हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर एअरटेल बिझनेसने उद्योगांसाठी 'एअरटेल सिक्युअर वर्कफोर्स' हे पूर्णतः व्यवस्थापित आणि एकात्मिक सायबर सुरक्षा समाधान सादर केले आहे. हायब्रिड कार्यपद्धतीत काम करणाऱ्या संस्थांच्या डेटा, उपकरणे आणि वापरकर्त्यांच्या सुरक्षेसाठी हे समाधान विकसित करण्यात आले आहे.

हे सुरक्षा व्यासपीठ उद्योगांना 24x7 देखरेख, डेटा संरक्षण आणि सुरक्षित दूरस्थ प्रवेशाची सुविधा देणार असून, भारताच्या डिजिटल डेटा संरक्षण कायद्याशी सुसंगत आहे. यामुळे उद्योगांना सुरक्षा खर्चात सुमारे ३० टक्क्यांपर्यंत बचत होण्याची अपेक्षा आहे.

एअरटेलच्या देशव्यापी नेटवर्क आणि तज्ज्ञ सेवांच्या आधारे हे समाधान सायबर हल्ल्यांपासून प्रभावी संरक्षण देईल. यामध्ये एकात्मिक नियंत्रण फलक, ऑडिट नोंदी, डेटा हालचाल नियंत्रण आणि घटनांवरील तत्काळ प्रतिसाद यांसारख्या सुविधा उपलब्ध आहेत.

एअरटेल बिझनेसचे मुख्य कार्यकारी अधिकारी शरद सिन्हा यांनी सांगितले की, बदलत्या सायबर धोक्यांना तोंड देण्यासाठी उद्योगांना विश्वासार्ह आणि सक्षम सुरक्षा प्रणालीची गरज आहे. 'सिक्युअर वर्कफोर्स'मुळे उद्योगांना सुरक्षिततेसोबतच खर्च कार्यक्षमतेचाही लाभ मिळेल.

## सनशाईन क्लासचे विद्यार्थी चमकले गुणवत्ता यादीत

**बोरगाव : हॅलो प्रभात**



येथील सनशाईन क्लासच्या विद्यार्थ्यांनी एनएमएमएस परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे. सलग आठव्या वर्षी क्लासने यशाची परंपरा कायम राखली असून, आतापर्यंत शिष्यवृत्ती मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या शतक पार झाली आहे.

यंदा शंभूराज मनोज पाटील, राजवर्धन रमेश पाटील, श्रेया निवृत्ती सलगर आणि श्रीधर चंद्रकांत वंजारी या चार विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत चमकदार यश मिळवले.

या विद्यार्थ्यांना केंद्र शासनाकडून इयत्ता नववी ते बारावीपर्यंत शिक्षणासाठी प्रत्येकी ४८ हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार आहे. या यशामुळे विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

विद्यार्थ्यांना क्लासच्या संचालिका विश्रांती देशमुख तसेच सागर वाझे आणि श्रीकांत कुरणे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केल्याची भावना व्यक्त होत आहे.

## 'उमंग टुडे'स वूमनचा महागौरव पुरस्कार सोहळा संपन्न



**मुंबई : हॅलो प्रभात**

येथील रवींद्र नाट्य मंदिर येथे 'उमंग टुडे'स वूमन आणि व्हिक्टर मणिकम फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने महागौरव पुरस्कार सोहळा उत्साहात पार पडला. मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक मान्यवर कलाकारांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा वाढली.

या सोहळ्यात उद्योग, शिक्षण, फॅशन, तंत्रज्ञान, कला आणि समाजसेवा क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या १०० हून अधिक कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव करण्यात आला. अभिनेत्री निवेदिता अशोक सराफ आणि डॉ. जयश्री राजगोपालन प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

कार्यक्रमाला सुमारे ८०० प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी 'वुमन ऑफ स्टील'सह विविध विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आले. समाजासाठी सकारात्मक कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देण्यासाठी भविष्यातही असे उपक्रम राबविणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

## आर्थिक वर्ष २०२६ मध्ये जीवन विमा उद्योगाची दमदार वाढ ; नवीन प्रीमियममध्ये १५.७ टक्के वाढ

**मुंबई : हॅलो प्रभात**

आर्थिक वर्ष २०२६ मध्ये जीवन विमा उद्योगाने उल्लेखनीय कामगिरी करत नवीन व्यवसाय प्रीमियममध्ये १५.७ टक्के वाढ नोंदवली आहे. एकूण नवीन व्यवसाय प्रीमियम ४.५९ लाख कोटी रुपयांवर पोहोचला असून, आर्थिक वर्ष २०२५ मध्ये हा आकडा ३.९७ लाख कोटी रुपये होता.

मार्च २०२६ महिन्यात उद्योगाने ७५,८७२ कोटी रुपयांचा नवीन व्यवसाय प्रीमियम गोळा केला. वैयक्तिक आणि समूह या दोन्ही विभागांतील वाढत्या मागणीमुळे ही वाढ साध्य झाली आहे.

समूह व्यवसाय विभागाने वाढीत मोठे योगदान दिले असून समूह एकल प्रीमियममध्ये १७.५ टक्के वाढ होऊन तो २.४९ लाख कोटी रुपयांवर पोहोचला. वैयक्तिक विभागातही स्थिर वाढ कायम राहिली. वैयक्तिक बिगर-एकल प्रीमियम १०.१ टक्क्यांनी वाढून १.२६ लाख कोटी रुपये, तर वैयक्तिक एकल प्रीमियम १२.३ टक्क्यांनी वाढून ५७,६६४ कोटी रुपयांवर पोहोचला.

याच कालावधीत उद्योगाने २.८३ कोटींपेक्षा अधिक पॉलिसी जारी केल्या, ज्यात मागील वर्षाच्या तुलनेत ४.७ टक्के वाढ झाली. यावरून जीवन विम्याबाबत ग्राहकांचा वाढता विश्वास आणि आर्थिक संरक्षणाबाबतची जागरूकता अधोरेखित होत असल्याचे तज्ज्ञांनी नमूद केले आहे.

## नियमित उपचारांनीच दम्यावर प्रभावी नियंत्रण : तज्ज्ञांचे मत

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

जागतिक दमा दिन २०२६ निमित्त तज्ज्ञांनी दम्याच्या प्रभावी नियंत्रणासाठी नियमित नियंत्रक उपचारांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. भारतात अनेक रुग्ण अजूनही केवळ तात्पुरता आराम देणाऱ्या औषधांवर अवलंबून असल्याने उपचारांमध्ये मोठी तफावत असल्याचे त्यांनी सांगितले.

तज्ज्ञांच्या मते, विलंबित निदान, इनहेलरबाबतचे गैरसमज आणि उपचारांचे अपुरे पालन यामुळे दम्याचे नियंत्रण प्रभावीपणे होत नाही. अभ्यासानुसार, डॉक्टरांनी सुचवलेल्या इनहेलरचा अनियमित वापर करण्याचे प्रमाण ७५ टक्क्यांपर्यंत आहे.

छातीरोग तज्ज्ञ डॉ. मोहन पोतदार म्हणाले, 'अनेक रुग्ण लक्षणे दिसल्यावरच इनहेलर वापरतात. मात्र, नियमित नियंत्रक उपचार आणि दाहविरोधी औषधांचा सातत्याने वापर केल्यास दम्यावर अधिक प्रभावी नियंत्रण मिळू शकते.'

तज्ज्ञांनी 'एकच इनहेलर - दुहेरी फायदा' या संकल्पनेवर भर देत, तात्काळ आरामासोबत दीर्घकालीन नियंत्रणासाठी नियमित उपचार आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. योग्य उपचार न झाल्यास रुग्णांच्या दैनंदिन जीवनावर गंभीर परिणाम होऊ शकतो, असेही त्यांनी नमूद केले.

दम्याबाबत जनजागृती आणि योग्य उपचारांसाठी विविध आरोग्य उपक्रम राबविण्यात येत असून, रुग्णांनी तज्ज्ञांच्या सल्ल्याने नियमित उपचार घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## विनोद रणदिवे यांची निवड

**नातेपुते : हॅलो प्रभात**



अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम १९८९ अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या सोलापूर जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीच्या अशासकीय सदस्यपदी विनोद बाळासो रणदिवे यांची निवड करण्यात आली आहे. विनोद रणदिवे गेली वीस वर्षे आंबेडकरी चळवळीत सक्रिय आहेत. रिपब्लिकन पक्षाच्या नातेपुते शहर संघटक पदापासून त्यांनी राजकीय आणि सामाजिक कार्याला सुरुवात केली. त्यानंतर तालुका उपाध्यक्ष, तालुका कार्याध्यक्ष युवक आघाडी आदी पदांवर त्यांनी काम केले आहे.

हॅलो प्रभात
नवे विचार...नवी सुरुवात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात, कार्यालय : स.न.१४/१५/२/३, फ्लॅट नं.२०, शिवपुष्प, ए पार्क, वडगाव बु., पुणे- ४११०४१.(महाराष्ट्र)** येथून प्रसिद्ध केले.

■ The imprint line should be printed legibly as Printed by Published by GANESH BANDA PATIL on behalf of GANESH BANDA PATIL, printed at and published at S.No.14/15/2/3, Flat No.20, Shivpushpa, A Park, Vadgaon B. Pune- 411041 **- Editor : Sanjeev Shalgaonkar**

■ **कोल्हापूर कार्यालय :** गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२ ■ **सांगली कार्यालय :** कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली.४१६४१६

■ **मुंबई कार्यालय :** सी-५०३, निर्मल रेसिडेन्सी, कात्रप रोड, गणेश घाट, बदलापूर (पू), ठाणे - ४२१५०३. ■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायक्षेत्र)

■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर ■ संपादक : संजीव शाळगावकर ■ संपर्क : 8551055113

## पुरंदर विमानतळ प्रकल्पाला गती; 1216.75 हेक्टर जमीन संपादन, मोबदला जाहीर

**पुरंदर : हॅलो प्रभात :** छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळ, पुरंदर प्रकल्पासाठी जमीन संपादन प्रक्रिया वेगाने सुरू असून, पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाने चार पानी सविस्तर सार्वजनिक प्रकटन जाहीर केले आहे. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी (भा.प्र.से.) यांच्या स्वाक्षरीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या या आदेशात मोबदला, पुनर्वसन व संमती प्रक्रियेची माहिती देण्यात आली आहे. तसेच उपजिल्हाधिकारी (भूसंपादन समन्वय) कल्याण पांढरे, जिल्हाधिकारी पुणे यांनीही या प्रक्रियेचे समन्वयन केल्याची माहिती देण्यात आली आहे. या प्रकल्पासाठी उदाचीवाडी, वनपुरी, कुंभारवळण, खानवडी, मुंजवडी, एखतपूर आणि पारगाव या गावांतील एकूण 1216.75 हेक्टर जमीन संपादित करण्यात येणार आहे. जमीन संपादनासाठी प्रति हेक्टर सुमारे ₹3,79,76,240 इतका मोबदला निश्चित करण्यात आला असून, त्यावर 12% अतिरिक्त व्याज देण्यात येणार आहे. विविध घटकांचा समावेश करून अंतिम मोबदला अधिक वाढणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. जमिनीच्या मोबदल्यासोबतच प्रकल्पग्रस्तांसाठी पुनर्वसनाच्या महत्त्वाच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. प्रभावित कुटुंबांना औद्योगिक क्षेत्रात 10% विकसित भूखंड देण्यात येणार असून, किमान 100 चौ.मी. भूखंडाची हमी आहे. घर गमावणाऱ्या कुटुंबांना 250 चौ.मी. पर्यंत निवासी भूखंड देण्यात येणार आहे. याशिवाय भूमिहीन शेतकऱ्यांना 750 दिवसांच्या मजुरीच्या समतुल्य रक्कम, तर अल्पभूधारकांना 500 दिवसांची आर्थिक मदत दिली जाणार आहे. घर स्थलांतरासाठी ₹40,000 व गोठा स्थलांतरासाठी ₹20,000 अनुदान देण्यात येणार आहे.

## अलोक घाडगेची दहावीच्या परीक्षेत उज्वल कामगिरी

### १७.२० टक्के गुणांसह घवघवीत यश



**सांगली : हॅलो प्रभात**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (एसएससी) परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत सांगलीतील अलोक विकास घाडगे याने ९७.२० टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. या यशामुळे सांगलीसह परिसरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अलोकने एकूण ५०० पैकी ४८१ गुण प्राप्त करत शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध केली. विषयनिहाय गुणांमध्ये मराठीमध्ये ८७, संस्कृतमध्ये ९९, इंग्रजीमध्ये ९३, गणितात ९८, विज्ञान व तंत्रज्ञानमध्ये ९४ तर समाजशास्त्रात ९७ गुण मिळवत सर्वच विषयांत उत्कृष्ट कामगिरी नोंदवली. या यशामागे त्याची जिद्द, सातत्यपूर्ण अभ्यास आणि पालक-शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन महत्त्वाचे घटक ठरले.

# 'स्वच्छ शहर' मानांकनसाठी लोकसहभागातून स्वच्छतेचा एल्गार

### नगरपालिकेचा 'संडे क्लीन-अप' उपक्रम : ऐतिहासिक वारसा जपण्याचा मानस




**पुरंदर : हॅलो प्रभात**

देशाच्या स्वच्छ सर्वेक्षण मोहिमेत अव्वल ठरलेल्या सासवड शहराने पुन्हा एकदा व्यापक स्वच्छता अभियान सुरू केले आहे. माजी आमदार संजय जगताप आणि नगराध्यक्षा आनंदी जगताप यांच्या नेतृत्वाखाली प्रत्येक रविवारी शहरातील विविध प्रभागांमध्ये श्रमदानातून स्वच्छता मोहीम राबवली जात आहे. वाढती लोकसंख्या आणि वाढलेल्या कचरा व्यवस्थापनाच्या ताणामुळे शहरातील काही भागांत कचरा साचत असल्याच्या तक्रारी होत्या. त्यावर उपाय म्हणून नगरपालिका, नगरसेवक, कर्मचारी आणि नागरिक एकत्र येऊन 'संडे क्लीन-अप' उपक्रम राबवत आहेत. नगरपालिकेच्या २४ घंटागाड्यांद्वारे दररोज ओला व सुका कचरा संकलित करून त्यापासून खतनिर्मिती केली जाते. सासवड हे पुरंदर किल्ला, जेजुरी खंडोबा मंदिर आणि नारायणपूर यांसारख्या तीर्थक्षेत्रांचे प्रवेशद्वार असल्याने शहर स्वच्छ ठेवण्यावर विशेष भर दिला जात आहे. वाढत्या पर्यटनाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक स्वच्छतागृहे व पिण्याच्या पाण्याच्या सुविधांची मागणीही नागरिकांनी केली आहे. अपुरी मनुष्यबळ आणि मर्यादित साधनसामग्री असूनही नगरपालिका राष्ट्रीय स्तरावरील स्वच्छ सर्वेक्षण स्पर्धेसाठी सज्ज झाली आहे.

### नागरिकांची साथ, स्वच्छतेची लाट

**वाढत्या लोकसंख्येमुळे स्वच्छतेचे आव्हान मोठे आहे, तरीही आमचे कर्मचारी आणि नगरसेवक मनापासून काम करत आहेत. आम्ही 'प्रत्येक रविवारी स्वच्छता' हा नवा संकल्प केला असून, त्याद्वारे शहराच्या कानाकोपऱ्यात पोहोचत आहोत. भाविकांच्या सोयीसाठी स्वच्छतागृहे आणि पाण्याची सोय वाढवण्यावर आमचा भर राहील. नागरिकांनीही ओला आणि सुका कचरा वेगवेगळा देऊन सहकार्य करावे.**

**- श्रीमती आनंदी जगताप,नगराध्यक्षा, सासवड नगरपालिका**

**सासवडची ओळख स्वच्छ आणि सुंदर शहर अशीच राहिली पाहिजे. लोकप्रतिनिधी नसतानाच्या काळात काही अडचणी आल्या होत्या, पण आता आम्ही पुन्हा एकदा संघटित होऊन शहराला स्वच्छतेच्या शिखरावर नेण्यासाठी प्रयत्नशील आहोत. नागरिकांचा वाढता सहभाग हेच आमचे यश आहे."**

**- संजय चंद्रकांत जगताप, माजी आमदार.**

## थोडक्यात पण महत्वाचे

### खा. लंके यांची प्रकृती बिघडली; उपचारासाठी पुण्याला रवाना

**अहिल्यानगर : हॅलो प्रभात**



शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे अहिल्यानगरचे खासदार निलेश लंके यांची प्रकृती अचानक खालावल्याचे समोर आले आहे. त्यामुळे त्यांना तातडीने पुण्यातील एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी हलवण्यात येत आहे. मागील २ ते ३ दिवसांपासून लंके यांच्यावर अहिल्यानगरमध्येच उपचार सुरू होते. मात्र, आज त्यांची प्रकृती अधिक बिघडल्याने डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार पुढील उपचारांसाठी त्यांना पुण्यात नेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, निलेश लंके यांची प्रकृती अधिकच खालावली आहे. त्यामुळे तातडीची वैद्यकीय मदत मिळावी यासाठी पुण्यातील तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार केले जाणार आहेत. दरम्यान, खासदार लंके यांच्या प्रकृतीबाबत वृत्त समजताच त्यांच्या समर्थकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. अहिल्यानगरवरून पुण्याकडे प्रवासादरम्यान डॉक्टरांची एक टीम त्यांच्यासोबत आहे.

### श्री सदगुरू विद्यालयाचा दहावीचा निकाल शंभर टक्के

**देऊळगाव गाडा : हॅलो प्रभात**

श्री सदगुरू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, देऊळगाव गाडा येथील एस.एस.सी. फेब्रुवारी/मार्च २०२६ परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला असून विद्यालयाने उज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयातील एकूण ७२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये अमृता बापूराव बारवकर व विवेक दीपक बारवकर यांनी प्रत्येकी ९४ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. अनुष्का सचिन जगताप, अवधूत दादा सुबारवकर व शंतनु दत्तात्रय शिंदे यांनी प्रत्येकी ९३ टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच नेहा जीवन बारवकर हिने ९२.२० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक प्राप्त केला. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक महादेव कुदळे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक वर्गातून विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत व जिद्दीच्या जोरावर हे यश संपादन केल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

### तक्रारींच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर शिवसेनेची कार्यकारिणी बरखास्त

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

**उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या आढावा बैठकीत निर्णय**

महाराष्ट्राचे उद्योगमंत्री तथा शिवसेनेचे अहिल्यानगर जिल्हा संपर्कमंत्री उदय सामंत यांच्याउपस्थितीतझालेल्याआढावाबैठकीत अहिल्यानगर जिल्ह्यातील शिवसेनेची सर्व अंगीकृत कार्यकारिणी बरखास्त करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. संघटनात्मक कामकाजाबाबत वाढत्या तक्रारी आणि त्रुटी आढळून आल्याने हा निर्णय घेण्यात आला. अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर, शिर्डी, राहुरी, नेवासा आणि श्रीरामपूर येथे झालेल्या बैठकीत सामंत यांनी तालुका व जिल्हास्तरीय संघटनात्मक कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी पक्ष संघटना वाढविण्यात पदाधिकाऱ्यांकडून कुचराई झाल्याचे निदर्शनास आले. नवीन कार्यकारिणीची निवड होईपर्यंत जिल्हाप्रमुख नितीनराव औताडे, कमलाकर कोते, बाबुशेठ टायरवाले आणि अनिल शिंदे यांच्याकडे प्रभारी म्हणून जबाबदारी कायम ठेवण्यात आली आहे. उदय सामंत यांनी आगामी काळात पक्ष संघटना अधिक बळकट करण्यासाठी नव्या जोमाने काम करण्याच्या सूचना शिवसैनिकांना दिल्या. युवासेना, शिवसेना, महिला आघाडी तसेच ग्रामीण भागातील सर्व अंगीकृत संघटनांची कार्यकारिणी बरखास्त करण्यात आली असून लवकरच नवीन कार्यकारिणी जाहीर केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बैठकीस आमदार अमोल खताळ, माजी खासदार सदाशिव लोखंडे, माजी आमदार भानुदास मुरकुटे, भाऊसाहेब कांबळे, शिवसेना नेते सागर बेग, जिल्हाध्यक्ष नितीन औताडे, प्रवक्ता संजीव भोर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ५३ विद्यार्थ्यांची अद्विक हाय-टेक कंपनीत निवड



**कोपरगाव : हॅलो प्रभात**

संजीवनी के.बी.पी. पॉलिटेक्निकच्या ५३ विद्यार्थ्यांची अद्विक हाय-टेक कंपनीत नोकरीसाठी निवड झाली आहे. ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांना ही सुवर्णसंधी मिळाली असून वयाच्या अवघ्या १९ व्या वर्षी हे विद्यार्थी कमावते बनले आहेत. मेकॅट्रॉनिक्स विभागातील २३ आणि इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागातील ३० विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना कंपनीकडून आकर्षक वेतन पॅकेज देण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्राशी जोडून रोजगारक्षम बनवण्यासाठी विभागाकडून विशेष प्रशिक्षण देण्यात येते. संस्थेचे अध्यक्ष नितीन कोल्हे व कार्यकारी विश्वस्त अमित कोल्हे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य ए. आर. मिरीकर उपस्थित होते. विद्यार्थी विशेष पानगव्हाणे यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील मर्यादित उत्पन्न असलेल्या कुटुंबातील विद्यार्थी म्हणून संजीवनीने दिलेल्या संधीमुळे करिअरची भक्कम सुरुवात झाली. या यशाबद्दल निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## जिजामाता विद्यालयाची उज्वल निकालाची परंपरा कायम







**पुरंदर : हॅलो प्रभात**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा ऑनलाईन निकाल नुकताच जाहीर झाला असून श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज जेजुरी या विद्यालयाचा ९८.०२ टक्के इतका उल्लेखनीय निकाल प्राप्त करत उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे.कु.प्रगती मंगेश कापरे ९४.८० टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम,कु. पवार वैष्णवी निलेश ९४.६० टक्के गुण मिळवून विद्यालयात द्वितीय तर कु.पवार आर्या अनंता हिने ९३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे. विद्यालयाच्या या दैदिप्यमान यशामुळे विद्यार्थी, पालक, शिक्षक व संस्थेमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यालयातून दहावीच्या बोर्ड परीक्षेसाठी एकूण १५२ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी तब्बल १४९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. विशेष श्रेणीत ५२ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत ५९ विद्यार्थी तर द्वितीय श्रेणीत ३१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या मेहनतीबरोबरच शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि पालकांचे मोलाचे सहकार्य यामुळे हे यश शक्य झाले असल्याची भावना व्यक्त होत आहे.

विद्यालयाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव तसेच विद्यालयाचे राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर यांनी समाधान व्यक्त केले. विद्यालयाचा निकाल हा केवळ टक्केवारी नसून विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे, शिक्षकांच्या समर्पणाचे आणि पालकांच्या विश्वासाचे फलित आहे. विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, शिस्तबद्ध अभ्यास आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे.प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये असलेली क्षमता ओळखून त्यांना योग्य दिशा देण्याचे कार्य आमचे शिक्षक सातत्याने करत असतात. यामुळेच विद्यालयाने दरवर्षी यशाची परंपरा अबाधित राखली आहे,आगामी काळातही विद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता अधिक वृद्धिंगत करून विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण, तंत्रज्ञान आणि स्पर्धा परीक्षांचे सक्षम मार्गदर्शन देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत,असे प्राचार्य नंदकुमार सागर यांनी सांगितले. संस्थेच्या अध्यक्षा आनंदीकाकी जगताप, पश्चिम महाराष्ट्र भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस व संस्थेचे सचिव, माजी आमदार संजयजी चंदूकाका जगताप, भारतीय प्रशासन सेवा अधिकारी व संस्थेचे विशेष सल्लागार डॉ. राजेंद्रबापू जगताप, संस्थेचे संस्थापक सचिव डॉ.एम. एस.जाधव, सहसचिव दत्तात्रय गवळी,संस्थेच्या समन्वयिका सोनालीताई शिंदे,ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा व संस्थेच्या विश्वस्त सौ. राजवर्धनीताई जगताप,भारती विद्यापीठाच्या संचालिका व संस्थेच्या विश्वस्त डॉ. अस्मिताताई जगताप, व्यवस्थापक कानिफनाथ अमराळे व रवींद्रपंत जगताप यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले.

## पुणे जिल्ह्यात अनधिकृत शाळांचा सुळसुळाट

**पुणे : हॅलो प्रभात**

पुणे जिल्ह्यातील शैक्षणिक वर्ष २०२६-२७ सुरू होण्यापूर्वीच शिक्षण विभागाने पालकांसाठी धोक्याची घंटा वाजवली आहे. पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड आणि ग्रामीण भागातील मिळून एकूण पंचेचाळीस शाळा अनधिकृत असल्याचे जिल्हा परिषदेने जाहीर केले आहे. यामध्ये पुरंदर तालुक्यातील एका प्रसिद्ध शाळेचाही समावेश असून, अशा शाळांमध्ये प्रवेश घेऊ नये, असे आवाहन शिक्षण प्रशासनाने केले आहे. पुणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने (प्राथमिक) ७ मे २०२६ रोजी जिल्ह्यातील अनधिकृत शाळांची अधिकृत यादी जाहीर केली आहे. अनेक शाळांकडे शासनाची कोणतीही मान्यता नसताना त्या पालकांची दिशाभूल करून प्रवेशाच्या जाहिराती करत असल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील आणि प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांनी ही माहिती प्रसिद्ध केली आहे. या यादीनुसार, पुरंदर तालुक्यातील 'श्रीनाथ इंग्लिश मीडियम स्कूल, वीर' ही शाळा अनधिकृत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या शाळेची मान्यता ऑगस्ट २००९ च्या निर्णयानुसार रद्द झाली असून, हे प्रकरण सध्या उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे. तरीही ही शाळा अनधिकृतरीत्या सुरू असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे. विभागीय आकडेवारी आणि सद्यस्थिती: पुणे ग्रामीण: एकूण २४ शाळा अनधिकृत आहेत. यामध्ये पुरंदर, खेड, मुळशी, भोर, इंदापूर आणि हवेली तालुक्यातील शाळांचा समावेश आहे. पुणे मनपा : १२ शाळांकडे अंतिम शासन मान्यता नसल्याचे निष्पन्न झाले आहे. पिंपरी-चिंचवड : ९ शाळा अनधिकृत असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या शाळांवर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पुरंदर तालुक्यातील वीर येथील श्रीनाथ इंग्लिश मीडियम स्कूल, या शाळेचा यामध्ये समावेश आहे.

### अधिकाऱ्यांवरही कारवाईची टांगती तलवार

**संबंधित कार्यक्षेत्रात जर अनधिकृत शाळा सुरू राहिल्या, तर स्थानिक स्तरावर कार्यरत असणाऱ्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांवर आणि गटशिक्षणाधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई केली जाईल, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.**

**पालकांनी आपल्या पाल्यांचा प्रवेश निश्चित करण्यापूर्वी शाळेकडे शासनाचे अधिकृत मान्यता पत्र असल्याची खात्री करावी. ज्या शाळांना मान्यता नाही तिथे प्रवेश घेतल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ शकते. अनधिकृत शाळांवर फौजदारी गुन्हे दाखल केले जातील.**

**-संजय नाईकडे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**

# तुतारीच्या गजरात सातारा दणाणला

### शरद पवारांच्या एंट्रीनं राष्ट्रवादी कार्यकर्त्यांमध्ये नवसंजीवनी

**सातारा : हॅलो प्रभात**

- शासकीय विश्रामगृहावर कार्यकर्त्यांचा अक्षरशः ताबा
- बंद दाराआड रंगल्या राजकीय आणि संघटनात्मक खलबतांना वेग

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या सातारा दौऱ्याने शनिवारी जिल्ह्याच्या राजकारणात पुन्हा एकदा प्रचंड खळबळ उडाली. आजारपणातून सावरल्यानंतर प्रथमच साताऱ्यात दाखल झालेल्या पवारांचे शासकीय विश्रामगृह येथे तुतारीच्या जयघोषात आणि घोषणांच्या कडकडाटात जंगी स्वागत करण्यात आले.

कार्यकर्त्यांच्या प्रचंड गर्दीमुळे संपूर्ण परिसर राष्ट्रवादीमय झाला होता. मुंबईवरून सायंकाळी चारच्या सुमारास पवारांचे वाहन शासकीय विश्रामगृहात दाखल होताच “शरद पवार आगे बढो”, “तुतारी वाजणारच” अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. कार्यकर्त्यांचा उत्साह एवढा प्रचंड होता की, खाजगी सुरक्षा रक्षक आणि सातारा पोलिसांना बंदोबस्तासाठी अक्षरशः धावपळ करावी लागली.

यावेळी खासदार सुप्रिया सुळे, राष्ट्रवादी प्रदेशाध्यक्ष तथा माजी आमदार शशिकांत शिंदे, जिल्हाध्यक्ष माजी आमदार बाळासाहेब पाटील, राजकुमार पाटील यांच्यासह राष्ट्रवादीचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. ९ मे, कर्मवीर भाऊराव पाटील पुण्यतिथी आणि शरद पवारांचा सातारा दौरा हे समीकरण राज्याच्या राजकारणात नेहमीच चर्चेचा विषय राहिले आहे. राष्ट्रवादीत फूट पडून दोन गट निर्माण झाले असले तरी साताऱ्यातील पवारनिष्ठ कार्यकर्ता अजूनही शरद पवारांभोवती ठामपणे उभा असल्याचे चित्र या दौऱ्यात स्पष्ट दिसून आले. दरम्यान, कर्मवीर पुण्यतिथीनंतर होणारी रयत शिक्षण संस्थेची बैठक अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जात असून संस्थेतील आगामी संघटनात्मक बदल, धोरणात्मक निर्णय आणि पुढील दिशा यावर बंद दाराआड जोरदार चर्चा सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली. रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या बैठकींमध्ये रयत शिक्षण संस्थेचे महत्त्वाचे पदाधिकारी उपस्थित होते. याशिवाय आगामी स्थानिक राजकारण, जिल्ह्यातील बदलती समीकरणे आणि राष्ट्रवादीच्या संघटनात्मक पुनर्बांधणीवरही सखोल चर्चा झाल्याचे समजते.



प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे आणि माजी आमदार बाळासाहेब पाटील यांच्यावर जिल्ह्यात पक्ष बळकट करण्याची मोठी जबाबदारी सोपवली जाणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

शासकीय विश्रामगृहातील अँटी चेंबरमध्ये तब्बल दीड तास सुरू असलेल्या बैठकींमुळे राजकीय चर्चांना आणखी उधाण आले. खासदार सुप्रिया सुळे या स्वतः सर्व बैठका, हालचाली आणि समन्वयावर बारकाईने लक्ष ठेवून होत्या. राज्यातील महिला अत्याचारांच्या वाढत्या घटना आणि पोलीस तपास यंत्रणेच्या कार्यपद्धतीबाबत त्यांनी तीव्र नाराजी आणि चिंता व्यक्त केल्याची माहितीही समोर आली आहे.

# 'सरस्वती स्कूल'ची विद्यार्थिनी अनुष्का गायकवाड प्रथम

## सरस्वती स्कूलचा दहावीचा निकाल शंभर टक्के

**कडेपूर : हॅलो प्रभात**



येथील सरस्वती स्कूल ने इयत्ता दहावीच्या परीक्षेत यंदाही उज्ज्वल यश संपादन करत १००% निकालाची परंपरा कायम राखली आहे. विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश मिळवत शाळेचा नावलौकिक उंचावला. तसेच कडेगाव केंद्रातून शाळेची विद्यार्थिनी अनुष्का गायकवाड हिने ९९.२०% गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला.यामध्ये अनुष्का गायकवाड हिने ९९.२०% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. सिद्धी मुळीक हिने ९६.८% गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला, तर सई पवार हिने ९५.२% गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला.

या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे संस्थापक माजी आमदार पृथ्वीराज देशमुख, संस्थेचे चेअरमन रविराज देशमुख, संस्थेच्या सचिव वृषाली देशमुख तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सुमिता सूर्यवंशी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.यावेळी शिक्षक व पालकांनीही विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल आनंद व्यक्त केला. सरस्वती स्कूलच्या सातत्यपूर्ण गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# भाजप पक्ष कोणाची मक्तेदारी नसून कार्यकर्त्यांचा पक्ष

## संग्रामसिंह देशमुख : सोनहिरा खोऱ्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

**देवराष्ट्रे : हॅलो प्रभात**

कडेगाव तालुक्यातील काँग्रेसचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या सोनहिरा खोऱ्यातील आसद गावात भाजपमध्ये जाहीर पक्षप्रवेश सोहळा व विकासकामांच्या भूमिपूजन कार्यक्रमात माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संग्राम संपतराव देशमुख यांनी विरोधकांवर जोरदार टीका केली. २०१९ साली उबाठा शिवसेनेने मतदारसंघ विकला नसता तर भाजपचा काम करणारा आमदार कसा असतो हे दाखवता आले असते. मी एकदा आमदार झालो तर कामाच्या जोरावर विरोधकांना संधीच मिळाली नसती," असे वक्तव्य त्यांनी केले. तसेच शक्तीपीठ महामार्गाच्या मुद्द्यावरून राजकारण करणाऱ्यांनी सरकारच्या दारात जाऊन आंदोलन करावे, शेतकऱ्यांच्या संमतीशिवाय सरकार कोणताही निर्णय घेणार



नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आसद गावासाठी जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या कार्यकाळात ८ कोटी रुपयांहून अधिक निधी दिल्याचे सांगत, भविष्यातही विकासासाठी निधी कमी पडू देणार नसल्याची ग्वाही देशमुख यांनी दिली. भारतीय जनता पार्टी हा कार्यकर्त्यांचा पक्ष असून सामान्य कार्यकर्त्यालाही मोठी संधी मिळते, असेही त्यांनी नमूद केले.कार्यक्रमास भाजप जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक, राजाराम गरुड, ॲड. विशाल मोहिते, विकास सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आसदचे लोकनियुक्त सरपंच मोहन जगन्नाथ जाधव यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. तसेच ताकारी योजना टप्पा क्रमांक ३ अंतर्गत रस्ता डांबरीकरण कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

# मुख्याध्यापकांसाठी शाळा पूर्वतयारी व नवोक्रम कार्यशाळा संपन्न



**मिणचे : हॅलो प्रभात**

येथील पंचायत समिती शिक्षण विभागाच्या वतीने तालुकास्तरीय मुख्याध्यापकांची शाळा पूर्वतयारी व नवोक्रम कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेच्या शिक्षण व अर्थ समिती सभापती शितल यादव होत्या.

या प्रसंगी मिशन अंकुर परीक्षेत विद्यामंदिर संभाजीनगर शाळेने प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक सरदार पाटील यांचा विशेष सत्कार करण्यात आला. आगामी शैक्षणिक वर्षात तालुक्यात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

कार्यक्रमास माजी शिक्षण व अर्थ समिती सभापती प्रवीण यादव, जिल्हा शिक्षण अधिकारी मीना शेंडकर, पंचायत समिती सभापती, उपसभापती, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, गटविकास अधिकारी, उपशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख तसेच सर्व शाळांचे मुख्याध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटशिक्षणाधिकारी नम्रता गुरसाळे यांनी केले.

# वडिलांच्या वर्षश्राद्धाला सामाजिक उपक्रमांची जोड

**सांगली : हॅलो प्रभात**

वडिलांच्या निधनानंतर त्यांचे वर्षश्राद्ध पारंपरिक पद्धतीने, केवळ जेवणावळी घालून साजरे करण्याऐवजी सांगलीतील ॲड. अभिषेक खोत यांनी या विधींना सामाजिक कृतज्ञतेची अर्थपूर्ण जोड दिली आहे. अनावश्यक खर्च टाळत त्यांनी शिक्षण, सेवा आणि पर्यावरण संवर्धनासाठी उचललेले पाऊल आज समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

माळवाडी (ता. पलुस) येथील 'क्षितिज अभ्यासिका' मध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थी अभ्यासासाठी येतात. मात्र, वारंवार होणाऱ्या वीज खंडिततेमुळे त्यांना रात्री अभ्यास करणे अत्यंत कठीण जात होते. ही अडचण त्यांचे मित्र व विक्रीकर अधिकारी श्री. संतोष चव्हाण यांनी त्यांच्या लक्षात आणून दिलेवर ॲड. खोत यांनी अभ्यासिकेला इन्व्हर्टर भेट दिला. त्यामुळे आता विद्यार्थ्यांचा अभ्यास ज्ञानदीपाप्रमाणे अखंडित सुरू राहणार असून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी ही मदत महत्त्वाची ठरणार आहे.

खंडोबाचीवाडी (ता. पलुस) येथील शाळेत प्रिंटर नसल्यामुळे शिक्षकांना साध्या प्रिंट किंवा झेरॉक्ससाठी २ किलोमीटर



### ॲड.अभिषेक खोत यांचा प्रेरणादायी उपक्रम

अंतर पार करावे लागत होते. ही समस्या कायमची दूर करत ॲड. खोत यांनी शाळेला प्रिंटर भेट दिला. यामुळे शिक्षकांचा वेळ वाचून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी त्याचा उपयोग होणार आहे. यामुळे शाळेला तांत्रिक बळ मिळाल्याची भावना तेथील शिक्षकांनी व्यक्त केली आहे. वर्षश्राद्धाच्या दिवशी त्यांनी सांगली येथील सावली बेघर निवारा केंद्रातील अनाथ लोकांना गोड जेवणाचा कार्यक्रम आयोजित केला होता. या उपक्रमामुळे गरजू वृद्ध आणि निराधारांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला आहे.

वडिलांचे निधन वयाच्या ६४ व्या वर्षी झाल्यामुळे त्यांच्या स्मरणार्थ येत्या पावसाळ्यात ६४ फळझाडे लावण्याचा संकल्प ॲड. खोत यांनी केला आहे. पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने हा उपक्रम दीर्घकालीन लाभदायक ठरणार आहे. विशेष म्हणजे, ॲड.अभिषेक खोत यांनी वडिलांच्या अंत्यविधीच्या वेळीही पर्यावरणाची जाणीव जपली. नदी प्रदूषण टाळण्यासाठी त्यांनी वडिलांच्या अस्थींचे नदीत विसर्जन न करता, आपल्या शेतात खड्डा खोदून त्यात वडिलांच्या अस्थी विसर्जित केल्या आहेत. तसेच त्यावर नारळाचे झाड लावले आहे. आजही ते झाड डोलताना दिसते आणि वडिलांच्या स्मृतींना जिवंत ठेवत आहे.

> वडिलांच्या आठवणी कायम राहाव्यात आणि समाजातील शेवटच्या घटकापर्यंत त्याचा लाभ पोहोचावा, या भावनेतून मी हे प्रयत्न केले आहेत. केवळ परंपरा पाळण्यापेक्षा त्यातून समाजोपयोगी कार्य घडवणे हीच खरी श्रद्धांजली आहे.
>
> **ॲड.अभिषेक खोत**

# दाते प्रशालेचा दहावी निकाल ९६ टक्के

**नातेपुते : हॅलो प्रभात**

**▶▶ भाग्यश्री ढोपे प्रथम**

येथील डॉ. बाळकृष्ण जयवंत दाते प्रशाला चा इयत्ता दहावीचा निकाल ९६.०० टक्के लागला असून शाळेने यंदाही उल्लेखनीय यश मिळवले आहे. कु. भाग्यश्री सुधीर ढोपे हिने ९४.४० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला आहे. स्वराली सतीश कचरे (९४.२० टक्के) द्वितीय तर वैष्णवी बोडरे व अनुष्का जाधव (९३.२० टक्के) यांनी संयुक्त तृतीय क्रमांक मिळवला. एकूण २५० विद्यार्थ्यांपैकी २४० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ५१ विद्यार्थी विशेष प्राविण्यात, ८३ प्रथम श्रेणीत, ७४ द्वितीय श्रेणीत आणि ३२ तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. या यशाबद्दल संस्थेचे मार्गदर्शक संचालक बाबाराजे देशमुख, चेअरमन बाहुबलीशेठ चंकेश्वरा, व्हाईस चेअरमन संतोष काळे, जनरल सेक्रेटरी ॲड. शिवाजीराव पिसाळ तसेच प्रशाला समिती सभापती अरविंद पाठक यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. मुख्याध्यापक विनायक देशपांडे, उपमुख्याध्यापक नवनाथ बांगर, पर्यवेक्षक निता मदने व संजय नाळे यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या निकालामुळे नातेपुते परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# संयोगिता पाटील केंब्रिज स्कूलचा दहावीचा १००% निकाल

**मिरज : हॅलो प्रभात**


### उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली

गुलाबराव पाटील मेमोरियल ट्रस्टच्या संयोगिता पाटील केंब्रिज स्कूल अँड ज्युनियर कॉलेज चा दहावीच्या १५ व्या बॅचचा निकाल याही वर्षी १००% लागला. विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश संपादन करून शाळेच्या उच्च गुणवत्तेची गौरवशाली परंपरा यंदाही कायम राखली. मार्च २०२६ मध्ये बोर्डाने घेतलेल्या परीक्षेत प्रथम क्रमांक – उदगावे नील किशोर ९९% , द्वितीय क्रमांक– शिंदे सोहम हनमंत ९८. ८०%, तृतीय क्रमांक –धुळूबळू अनिश अभिजीत ९७. ६०% तसेच गडदावर निधी अजय–९५. ६०% ,बेडेकर निहारिका श्रीनिवास ९५. ४०%,पाटील तन्मय प्रकाश ९५. ४०% त्याचबरोबर ९०% च्या पुढचे १२ विद्यार्थी ,डिस्टिंक्शन चे विद्यार्थी ४८ आणि फर्स्ट क्लास चे विद्यार्थी ४७ असा निकाल हा विद्यार्थ्यांच्या मेहनतीसोबतच संस्थेचे संस्थापक चेअरमन मा. पृथ्वीराजबाबा पाटील यांनी संस्थेकडून उपलब्ध करून दिलेल्या शैक्षणिक सुविधा आणि त्यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन, शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य महत्त्वाचे ठरले. विद्यार्थ्यांनी विविध विषयांमध्ये उल्लेखनीय गुण मिळवून आपली गुणवत्ता सिद्ध केली. शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीदेवी कुल्लोळी मॅडम तसेच साहेबलाल शरीक मसलत यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी संस्थेचे संस्थापक पृथ्वीराज पाटील आणि संस्थेचे विश्वस्त वीरेंद्रसिंह पाटील यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना सातत्यपूर्ण अभ्यास, आत्मविश्वास आणि शिस्त यामुळे हे यश शक्य झाल्याचे सांगितले. तसेच कॅम्पस कॉर्डिनेटर सतीश पाटील ,अधिक्षीका ख्रिस्तीना मार्टिन यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. शाळेच्या या उल्लेखनीय यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# 'आदर्श'च्या विद्यार्थ्यांची 'मेटल फॉर्मिंग एक्स्पो २०२६'ला भेट

**विटा : हॅलो प्रभात**

येथील आदर्श इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च सेंटर,येथील यांत्रिकी अभियांत्रिकी विभागाच्या वतीने द्वितीय व तृतीय वर्ष च्या विद्यार्थ्यांसाठी पुणे येथील आंतरराष्ट्रीय प्रदर्शन व अधिवेशन केंद्र, मोशी, पुणे येथे आयोजित 'मेटल फॉर्मिंग एक्स्पो २०२६' ला औद्योगिक भेट देण्यात आली. ही भेट शैक्षणिक अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून आयोजित करण्यात आली होती. या औद्योगिक भेटीस प्रा. व्ही. पी. पाटील, प्रा. आर. टी. वाघमारे आणि प्रा. आर. बी. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांना धातू प्रक्रिया, आधुनिक उत्पादन तंत्रज्ञान आणि औद्योगिक क्षेत्रातील नव्या पद्धतींची प्रत्यक्ष माहिती मिळावी हा या भेटीचा




मुख्य उद्देश होता.

एक्स्पोमध्ये विद्यार्थ्यांना ऑटोमोबाईल, एरोस्पेस आणि संरक्षण क्षेत्रामध्ये वापरल्या जाणाऱ्या अत्याधुनिक यंत्रणा, ऑटोमेशन प्रणाली तसेच इंडस्ट्री ४.० तंत्रज्ञानाची माहिती मिळाली. विविध उद्योग तज्ज्ञांशी संवाद साधताना विद्यार्थ्यांनी उत्पादन प्रक्रिया, गुणवत्ता नियंत्रण आणि प्रगत उत्पादन प्रणालींबाबत प्रत्यक्ष अनुभव घेतला.

या औद्योगिक भेटीमुळे विद्यार्थ्यांना मॅन्युफॅक्चरिंग सायन्स, मॅन्युफॅक्चरिंग प्रोसेस, मशीन डिझाईन तसेच मेट्रोलॉजी आणि क्वालिटी कंट्रोल या विषयांतील सैद्धांतिक ज्ञानाचे औद्योगिक अनुप्रयोग समजण्यास मोठी मदत झाली.

औद्योगिक सहल यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय ॲड.सदाशिवराव पाटील यांचे दूरदर्शी नेतृत्व व प्रेरणा विद्यार्थ्यांसाठी सदैव मार्गदर्शक ठरत आहे. संस्थेचे अध्यक्ष ॲड.वैभव पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी दिलेल्या सतत प्रोत्साहनाबद्दल विभागाने त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. संचालिका पूजा पाटील यांनी या उपक्रमासाठी दिलेले सहकार्य व पाठिंबा, प्राचार्य डॉ.पी.एस.पाटील यांचे मार्गदर्शन, रजिस्ट्रार, सर्व अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख तसेच यांत्रिकी विभागाच्या सर्व प्राध्यापक वृंदाचे अमूल्य सहकार्य व सतत पाठिंबा यासाठी विभागाने हार्दिक कृतज्ञता व्यक्त केली आहे.

अशा प्रकारच्या औद्योगिक सहलींमुळे विद्यार्थ्यांचे व्यावहारिक ज्ञान, आत्मविश्वास व उद्योग जगतातील दृष्टिकोन यात निश्चितच वाढ होते. यांत्रिकी अभियांत्रिकी विभाग भविष्यातही असे उपक्रम राबवत राहील, असा विश्वास विभागप्रमुखांनी व्यक्त केला.

# प्रभावी पर्यावरण संवर्धनासाठी समन्वयाची गरज

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

**• शिवाजी विद्यापीठ येथील गोलमेज परिषदेत मत**

पर्यावरण संवर्धनासाठी कार्यरत संस्था, संघटना आणि नागरिकांनी समन्वय व सहकार्याच्या माध्यमातून एकत्रित काम केल्यास प्रभावी पर्यावरण संरक्षण शक्य होईल, असा सूर शिवाजी विद्यापीठ येथे आयोजित गोलमेज परिषदेत उमटला.

पर्यावरणशास्त्र विभाग, विद्यापीठ विकास मंच आणि कोल्हापूर अर्थ वॉरियर्स यांच्या संयुक्त विद्यमाने या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास 'दै. सकाळ'चे संपादक निखिल पंडितराव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी बोलताना त्यांनी वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि नैसर्गिक संसाधनांची घट ही गंभीर समस्या असल्याचे सांगितले. पर्यावरण संवर्धन ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असून वृक्षारोपण, जलसंवर्धन आणि प्लास्टिकमुक्त उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रसारमाध्यमे पर्यावरण विषयांवर सातत्याने जनजागृती करत असल्याचेही त्यांनी नमूद केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. विलास शिंदे यांनी विद्यापीठाने पर्यावरण संरक्षणाला सर्वोच्च प्राधान्य दिल्याचे सांगितले.

जलसंवर्धनाच्या उपक्रमांमुळे विद्यापीठ जलस्वयंपूर्ण झाले असून भविष्यातही पर्यावरणीय संवर्धनासाठी सकारात्मक प्रयत्न सुरू राहतील, असे त्यांनी यावेळी सांगितले.

# रायवाडी व वाघोली मुक्काम गाड्या तात्काळ सुरू करा

**▶▶ सरपंच साधना शिंदे**

**कवठेमहंकाळ : हॅलो प्रभात**

कवठेमहंकाळ एसटी डेपो स्थापन झाल्या पासून सुरू असणारी कवठेमहंकाळ–रायवाडी व सांगली–वाघोली या मुक्कामी असणाऱ्या एसटी बस सेवा हे कोणतेही कारण न देता अचानक बंद केल्या आहेत. त्यामुळे प्रवासीवर्गाचे अतोनात हाल होत आहे.तरी या बससेवा तात्काळ सुरू करा अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा सज्जड इशारा वाघोली (ता. कवठेमहांकळ) गावच्या लोकनियुक्त सरपंच सौ साधना तुकाराम शिंदे यांनी दिला आहे.

पत्रकारांशी बोलताना साधना शिंदे म्हणाल्या की एकतर वाघोली हे गाव अगदीच आडवळणी गाव असुन,या गावात अगदी ठराविकच एसटी बसची



ये–जा सुरू असते. त्याही गाड्या आल्या नाहीत तर अक्षरशः प्रवाश्यांची खूप मोठी गैरसोय निर्माण होते. त्यामुळे त्यांना एकतर पाचसहा किलोमीटर अंतरावरील शेळकेवाडी येथे किंवा तितक्याच अंतरावरील 'वाघोली वड' या ठीकाणी जावे लागते. हे जनसामान्य प्रवाशांना, महीलांना व विद्यार्थ्यांना आश्यक्य होते. हे वारोंवार संबंधित विभागांना सांगुनही त्याची दखल घेतली जात नाही.

या गावातून कवठेमहंकाळला व सांगलीला कामानिमित्ताने जाणाऱ्या लोकांची व विद्यार्थ्यांची संख्याही मोठी आहे तेव्हा सदर मुक्कामी येणार्या कवठेमहंकाळ–रायवाडी व सांगली–वाघोली या एसटी बस सेवा तात्काळ सुरू करा अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा सौ साधना तुकाराम शिंदे यांनी दिला आहे.यावेळी युवा नेते प्रतापराव शिंदे, माजी उपसरपंच दत्तात्रय आठवले,जेष्ठ नेते तुकाराम शिंदे, प्रदीप शिंदेसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# वर्धापनदिन हा समाज एकत्र आणणारा आध्यात्मिक सोहळा : रणधीर नाईक



**शिराळा : हॅलो प्रभात**

वाकाईवाडी येथे वाकाईदेवी मंदिराचा १५ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावात साजरा करण्यात आला. ग्रामस्थ, मुंबईकर बांधव आणि परिसरातील भाविकांच्या एकत्रित सहभागातून हा सोहळा पार पडला. यावेळी यशवंत ग्लुकोज कारखान्याचे अध्यक्ष रणधीर नाईक यांनी सदिच्छा भेट देत वर्धापन दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, वर्धापन दिन हा केवळ उत्सव नसून समाजाला धार्मिक व आध्यात्मिकदृष्ट्या एकत्र आणणारा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. वाकाईवाडी–बोरगेवाडी ग्रामस्थांनी गेल्या १५ वर्षांपासून कुलस्वामी देवीचा वर्धापन दिन मोठ्या श्रद्धेने साजरा करून आदर्श निर्माण केला आहे, असेही त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमास शिराळा मार्केट कमिटी संचालक के. वाय. भाटे, सरपंच शंकर बोरगे तसेच मुंबईतील मान्यवर नानासो भाटे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. आबासो शेवाळे, विश्वास बोरगे, संभाजी चव्हाण, सर्जेराव चव्हाण, प्रकाश चव्हाण, शशिकांत बोरगे, किसन बोरगे, विलास बोडके, पिंटू चव्हाण आदी ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. कार्यक्रमादरम्यान भजन, आरती आणि विविध धार्मिक विधींनी परिसर भक्तिमय झाला. ग्रामस्थांच्या एकत्रित सहभागामुळे वाकाईवाडी परिसरात उत्साहाचे आणि आध्यात्मिकतेचे वातावरण निर्माण झाले.

# मुख्यमंत्री यांच्या पुढाकारातून श्वसनविकारांच्या निदानाला मिळणार गती

## इंडियन ऑइलच्या सीएसआर उपक्रमातून सर जे. जे. रुग्णालयाला मिळणार अत्याधुनिक ब्रॉन्कोस्कोप प्रणाली – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**मुंबई : हॅलो प्रभात**

राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवांना अधिक सक्षम आणि आधुनिक करण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे.इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड च्या सीएसआर उपक्रमांतर्गत मुंबईतील सर जे.जे.हॉस्पीटी येथे अत्याधुनिक हाय-डेफिनिशन व्हिडिओ ब्रॉन्कोस्कोप प्रणाली उपलब्ध करून देण्यात आली आहे.

सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवून सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार उपचार उपलब्ध करून देण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्नशील असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

सर जे. जे. रुग्णालयातील फुफ्फुसविकार विभागामध्ये दरमहा सुमारे ७० ते ८० ब्रॉन्कोस्कोपी प्रक्रिया केल्या जातात. क्षयरोग, विशेषतः औषध-प्रतिरोधक क्षयरोग, फुफ्फुसाचा कर्करोग, इंटरस्टिशियल लंग डिसीज आणि श्वसनमार्गातील अडथळे यांसारख्या गंभीर आजारांचे लवकर निदान करण्यासाठी ब्रॉन्कोस्कोपी अत्यंत महत्त्वाची मानली जाते.

मात्र, जुन्या आणि कालबाह्य उपकरणांमुळे वेळेवर आणि अचूक निदान करण्यात अडचणी येत होत्या. याच पार्श्वभूमीवर इंडियन ऑइलने सीएसआरच्या माध्यमातून हाय-डेफिनिशन व्हिडिओ ब्रॉन्कोस्कोप प्रणाली उपलब्ध करून दिली असून त्यामुळे रुग्णालयाच्या निदान क्षमतेत मोठी वाढ होणार आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे श्वसनविकारांचे अचूक आणि जलद निदान शक्य होईल, तसेच गंभीर रुग्णांवर वेळेत उपचार सुरू करण्यास मदत मिळणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या उपक्रमाचे स्वागत करताना सांगितले की, राज्य शासनाच्या आरोग्य क्षेत्रातील सुधारणांना विविध उद्योगसमूह आणि सार्वजनिक उपक्रमांचे सहकार्य लाभत आहे. इंडियन ऑइलच्या या उपक्रमामुळे गरीब आणि गरजू रुग्णांना अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा सरकारी रुग्णालयातच उपलब्ध होतील. लवकर निदान आणि वेळेत उपचार यामुळे अनेकांचे प्राण वाचविण्यास मदत होईल.

या नव्या प्रणालीमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील रुग्णांना खासगी रुग्णालयांमध्ये महागड्या तपासण्यांसाठी जाण्याची गरज कमी होणार असून सरकारी आरोग्य व्यवस्थेवरील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होणार आहे. श्वसनविकारांच्या उपचारामध्ये ही सुविधा महत्त्वाची ठरणार असून सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात आधुनिक वैद्यकीय उपकरणांच्या उपलब्धतेसाठी सीएसआर भागीदारीचे हे एक प्रभावी उदाहरण मानले जात आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे

### ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या नियमित ‘कॅप फेरी-१’चे वेळापत्रक जाहीर

**मुंबई : हॅलो प्रभात**

राज्यातील इयत्ता 11 वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेअंतर्गत शैक्षणिक वर्ष 2026-27 साठी नियमित कॅप फेरी-1 चे वेळापत्रक माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने जाहीर केले आहे. 8 मे रोजी इयत्ता दहावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यांना प्रवेश अर्जाचा भाग-1 आणि भाग-2 भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून, 8 मे 2026 पर्यंत एकूण सात लाख 74 हजार 918 विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जाचा भाग- 1 भरून नोंदणी केली आहे. इयत्ता 11 वी प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांनी https://mahafyjcadmissions.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध माहिती व सूचनांनुसार ऑनलाईन अर्ज सादर करावेत, असे आवाहन शिक्षण संचालनालयाने केले आहे. प्रवेश प्रक्रियेमध्ये तीन नियमित फेऱ्या, ओपन टू ऑल चौथी फेरी, मुलींकरीता विशेष पाचवी फेरी घेण्यात येत आहे. त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांनी आपल्या प्रवेशासाठी ऑनलाईन पद्धतीने नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. शून्य फेरी मध्ये 8 ते 20 मे या कालावधीत विद्यार्थ्यांना नोंदणी व अर्जाचा भाग 1 ऑनलाईन सादर करणे, तात्पुरती सर्वसाधारण गुणवत्ता यादी प्रदर्शित करणे, हरकती/ दुरुस्ती मागण्या, सर्वसाधारण गुणवत्ता यादी अंतिम करणे, विविध कोट्यासाठी यादी देऊन रिक्त जागा प्रत्यार्पित करणे तसेच पहिल्या फेरीकरीता जागा प्रदर्शित करणे ही प्रक्रिया होईल. नियमित कॅप फेरी-1 अंतर्गत नवीन विद्यार्थ्यांची नोंदणी, भाग-1 मधील दुरुस्ती तसेच भाग-2 भरण्याची प्रक्रिया 21 आणि 22 मे रोजी होईल. विद्यार्थ्यांना किमान एक आणि कमाल दहा कनिष्ठ महाविद्यालयांना पसंतीक्रम देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. कॅप फेरी-1 ची अलॉटमेंट प्रक्रिया 23 ते 26 मे दरम्यान पार पडणार असून, 26 मे रोजी प्रवेश वाटप यादी जाहीर करण्यात येणार आहे.

# 15 मे रोजी तिघी ’च्या वर्ल्ड डिजिटल प्रीमियरची घोषणा!

**पुणे : हॅलो प्रभात**




मराठी चित्रपटसृष्टीत समीक्षकांची प्रशंसा आणि प्रेक्षकांचे भरभरून प्रेम मिळवलेला ‘तिघी’ हा संवेदनशील चित्रपट आता डिजिटल माध्यमातून जगभरातील प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 15 मे 2026 रोजी हा चित्रपट ZEE5 वर वर्ल्ड डिजिटल प्रीमिअरद्वारे प्रदर्शित होणार असून, कौटुंबिक नातेसंबंधांच्या भावनिक गुंतागुंतीचा वेध घेणारी ही कथा पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. सुप्री ॲडव्हर्टायझिंग ॲंड एंटरटेनमेंट प्रायव्हेट लिमिटेड निर्मित आणि दिग्दर्शिका जीजिवीशा काळे यांच्या पहिल्याच चित्रपटाने प्रेक्षकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले आहे.

‘तिघी’ ही तीन महिलांच्या आयुष्याभोवती फिरणारी भावनिक कथा आहे. चित्रपटाची मध्यवर्ती व्यक्तिरेखा स्वाती रानडे-कर्णिक ही असून तिची भूमिका नेहा पेंडसे बायस यांनी साकारली आहे. मुंबईत स्थिर आयुष्य जगणाऱ्या स्वातीचे आयुष्य वैयक्तिक आणि आर्थिक संकटांमुळे विस्कळीत होऊ लागते. त्याच वेळी तिची विभक्त राहणारी आई हेमलता रानडे, जिनची भूमिका भारती आचरेकर यांनी केली आहे.

# नसरापूर येथील चिमुरडीवरील अत्याचारप्रकरणी संताप

## आरोपीला फाशीची शिक्षा द्या; सकल मुस्लिम युवक संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

### फास्ट ट्रॅक न्यायालयात खटला चालविण्याची मागणी

**ईश्वरपूर : हॅलो प्रभात**



पुणे जिल्ह्यातील नसरापूर (ता. भोर) येथे चार वर्षीय चिमुरडीवरील अत्याचार व हत्या प्रकरणाच्या निषेधार्थ सकल मुस्लिम युवक संघटना यांच्या वतीने सांगली जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करत आरोपीला कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी करण्यात आली. संघटनेच्या निवेदनात म्हटले आहे की, “चार वर्षीय निष्पाप बालिकेवरील अत्याचार आणि हत्या ही घटना अत्यंत संतापजनक, अमानुष व मानवतेला काळिमा फासणारी आहे. एवढ्या लहान मुलीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करणाऱ्या नराधमाला कोणतीही दया न दाखवता तात्काळ फाशीची शिक्षा देण्यात यावी. या घटनेमुळे राज्यभरात माता-भगिनी, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. भविष्यात अशा विकृत प्रवृत्तीच्या गुन्हेगारांवर वचक बसावा यासाठी प्रशासनाने कठोर भूमिका घेऊन उदाहरणार्थ कारवाई करावी, अशी मागणी संघटनेने केली. सकल मुस्लिम युवक संघटनेने सदर प्रकरणाचा खटला फास्ट ट्रॅक न्यायालयामार्फत जलदगतीने चालवून आरोपीला तातडीने कठोर शिक्षा देण्याची मागणी केली आहे. तसेच राज्यात वाढत्या महिला व बालकांवरील अत्याचाराच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर प्रभावी कायदे, कडक अंमलबजावणी आणि विशेष सुरक्षा यंत्रणा उभारण्याचीही मागणी करण्यात आली. यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अमीर हवलदार, जत तालुका अध्यक्ष महम्मद शेख, वाळवा तालुका अध्यक्ष तन्वीर संदे, उपाध्यक्ष इर्शाद हवलदार, शादाब फकीर, साद दिवाण, मुद्दसर पठाण, फजल हवलदार, शरीफ शिकलगार, असीम इबुशे, तन्वीर दिवाण, अकबर शेख, सुहेल चाऊस, अमीर शिकलगार आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# रेठरे धरण ग्रामपंचायतीच्या इमारतीचे उद्घाटन

## आ. जयंतराव पाटील यांच्या हस्ते स्वस्थ जल केंद्राचाही लोकार्पण सोहळा

**रेठरे धरण : हॅलो प्रभात**



रेठरे धरण ग्रामपंचायतीने बांधलेल्या नवीन ग्रामपंचायत इमारतीचे तसेच नागरिकांसाठी उभारण्यात आलेल्या स्वस्थ जल केंद्राचे (वॉटर एटीएम) उद्घाटन राज्याचे माजी जलसंपदा मंत्री तथा आमदार जयंत पाटील यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. यावेळी माजी राज्यमंत्री शिवाजीराव नाईक सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष तथा माजी आमदार मानसिंगराव नाईक प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी माजी राज्यमंत्री शिवाजीराव नाईक व माजी आमदार मानसिंगराव नाईक यांच्या हस्ते श्रीफळ फोडण्यात आले. त्यानंतर आमदार जयंतराव पाटील यांनी फीत कापून नवीन ग्रामपंचायत इमारतीचे व स्वस्थ जल केंद्राचे उद्घाटन केले. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात आमदार जयंतराव पाटील, शिवाजीराव नाईक, मानसिंगराव नाईक यांच्यासह विविध मान्यवरांनी मनोगते व्यक्त करत ग्रामविकासासाठी अशा सुविधा महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष देवराज पाटील, जिल्हा परिषद अध्यक्षा संगीताताई पाटील, सभापती उदयसिंह पाटील, जिल्हा परिषद सदस्य संध्याताई पाटील व मंदाताई माळी, पंचायत समिती सदस्य रेश्माताई गुरव व सुप्रियाताई पाटील, राष्ट्रवादीचे सरचिटणीस बाळासाहेब पाटील, राजारामबापू कारखान्याचे संचालक अतुल पाटील, सरपंच हर्षवर्धन पाटील, उपसरपंच मदन पाटील, नेर्ले गावचे सरपंच संजय पाटील यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हायब्रिड कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी एअरटेलचे ‘झिरो ट्रस्ट’ समाधान लॉन्च

**पुणे : हॅलो प्रभात**

AI-आधारित सायबर हल्ल्यांचे वाढते प्रमाण आणि त्यांची गुंतागुंत लक्षात घेता, उद्योगांसमोर डेटा आणि नेटवर्क सुरक्षेचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. या पार्श्वभूमीवर एअरटेल बिझनेस ने भारतातील उद्योगांसाठी ‘एअरटेल सिक्युअर वर्कफोर्स’ हे देशातील पहिले पूर्णतः व्यवस्थापित आणि एकात्मिक झिरो ट्रस्ट आर्किटेक्चर (ZTA) आधारित सुरक्षा समाधान सादर केले आहे. हायब्रिड वर्कफोर्ससाठी विकसित करण्यात आलेले हे समाधान वापरकर्ते, डेटा आणि उपकरणांचे कुठूनही आणि केव्हाही संरक्षण करण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहे. नवी दिल्ली येथे गुरुवारी या समाधानाची घोषणा करण्यात आली. AI-आधारित सायबर हल्ल्यांचा वेग आणि प्रमाण झपाट्याने वाढत असून 2025 मध्ये भारतात 20 लाखांहून अधिक सायबर सुरक्षा घटना नोंदविण्यात आल्या होत्या. या वाढत्या धोक्यांचा सामना करण्यासाठी एअरटेलने हे एंड-टू-एंड सुरक्षा व्यासपीठ विकसित केले आहे. एअरटेलच्या देशव्यापी नेटवर्क, 24x7 तज्ज्ञ देखरेख आणि राष्ट्रीय स्तरावरील सायबर सुरक्षा अनुभवाच्या आधारे हे समाधान उद्योगांना अधिक सक्षम सुरक्षा देणार आहे.

# देशभर दंगली घडवण्याचे भाजपाचे षडयंत्र : हर्षवर्धन सपकाळ

## पश्चिम बंगालमधील दंगली या त्याची सुरुवात

**मुंबई : : हॅलो प्रभात**



भारतभरात दंगली घडवून आणण्याचे कारस्थान भारतीय जनता पक्षाकडून सुरु आहे, त्यासाठी प्रशिक्षण हाती घेतल्याची माहिती आहे. पाच राज्यातील निवडणुकांच्या निकालापासूनच धार्मिक तेढ निर्माण करण्याची प्रक्रिया सुरु केलेली आहे. २००२ मध्ये गुजरातमध्ये जशा दंगली घडवून आणल्या होत्या, त्याच पद्धतीने देशभर दंगली करुन २०२९ च्या निवडणुका जिंकायच्या हे षडयंत्र आधीपासूनच रचले असून विधानसभा निवडणुकीनंतर सुरु झालेल्या दंगली या त्याचे पहिले पाऊल आहे, असा गंभीर आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

टिळक भवन येथे प्रसार माध्यमांशी संवाद साधताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, भारतीय जनता पक्षाने पश्चिम बंगाल, आसामसह पाच राज्यातील निवडणुकीत हिंदू मुस्लीम द्वेष वाढवणारा अजेंडा चालवला, त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही कारण जनगणनेनंतर जानेवारी २०२८ मध्ये डिलिमिटेशनची प्रक्रिया सुरु होणार आहे. डिलिमिटेशनसाठी सुप्रीम कोर्टातील कोणत्या निवृत्त न्यायाधिशाला डिलिमिटेशन कमिटीत घ्यायचे हे सुनिश्चित झालेले आहे. डिलिमिटेशन नंतरचा मतदार संघाचा नकाशाही तयार झालेला आहे, असेही हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले आहे. तामिळनाडूतील राजकीय घडामोडींवर बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, तामिळनाडूत निवडणुकीनंतर उद्भवलेल्या परिस्थितीत जोसेफ विजय यांच्या पक्षाला पाठिंबा देण्याचा निर्णय हा स्थानिक नेते, प्रभारी यांनी सर्वांशी विचारविनिमय करुनच पक्षश्रेष्ठींनी घेतलेला आहे. टीव्हीके पक्षाबरोबर निवडणुकीपूर्वीच आघाडी करावी अशी स्थानिक नेते व कार्यकर्त्यांची मागणी होती, त्यावेळीच तसा निर्णय घेतला असता तर काँग्रेस पक्षाचे जास्त आमदारही निवडून आले असते पण लोकशाही व संविधान वाचवण्यासाठी लढा देणाऱ्या पक्षाबरोबर आघाडी करण्यास काँग्रेस कटिबद्ध आहे, असेही सपकाळ म्हणाले.

मुंबई महानगरपालिकेने संडास बांधण्यात भ्रष्टाचार केल्याच्या प्रश्नाला उत्तर देताना सपकाळ म्हणाले की, भ्रष्टाचारासाठी भाजपाला संडासची जागाही कमी पडत आहे. याआधी सुलभ शौचालयात भाजपाने भ्रष्टाचार केला होता. मोहित कंभोज यांना मलिदा आणि कार्यकर्त्यांना मात्र संडासची जागा, असा टोलाही सपकाळ यांनी लगावला.

# सकारात्मक दृष्टीकोनातून टीकेचा स्वीकार करावा

**मुंबई : हॅलो प्रभात**




■ 'टेक-वारी २.०' अंतर्गत ‘यशदा’तील प्रशिक्षक रविबाला काकतकर यांचे मार्गदर्शन

एखाद्याने केलेली टीका आपण स्वीकारलीच नाही, तर तिचा आपल्या मनावर कोणताही परिणाम होत नाही, असा सकारात्मक दृष्टिकोन गौतम बुद्धांच्या बोधकथेतून समोर येतो. टीकेकडे नकारात्मकतेने न पाहता शांतपणे, संयमाने आणि आत्मविश्वासाने सामोरे जाणे हीच प्रभावी व्यक्तिमत्त्वाची ओळख असल्याचे प्रतिपादन ‘यशदा’तील प्रशिक्षक रविबाला काकतकर यांनी केले. सामान्य प्रशासन विभागामार्फत आयोजित “TECHवारी 2.0” अंतर्गत मंत्रालयात आयोजित विशेष तांत्रिक सत्रात त्या बोलत होत्या. सामान्य प्रशासन विभागामार्फत आयोजित “TECHवारी 2.0” अंतर्गत मंत्रालय, येथील परिषद सभागृहात “The Art of Handling Criticism” या विषयावर विशेष तांत्रिक सत्राचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रसिद्ध कॉर्पोरेट ट्रेनर तसेच ‘यशदा’तील प्रशिक्षक वक्त्या रविबाला काकतकर यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना संवाद कौशल्य, भावनिक संतुलन आणि टीकेकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहण्याबाबत मार्गदर्शन केले. रविबाला काकतकर म्हणाल्या की, टीका हा जीवनाचा अविभाज्य भाग असून तिला नकारात्मक दृष्टीने पाहण्याऐवजी “फीडबॅक” म्हणून स्वीकारणे आवश्यक आहे. व्यक्त होणे आणि प्रतिक्रिया देणे यांतील फरक स्पष्ट करताना त्या म्हणाल्या की, भावनिक प्रतिक्रिया अनेकदा परिस्थिती अधिक गुंतागुंतीची बनवते, तर संयमाने आणि विचारपूर्वक दिलेले उत्तर व्यक्तीची परिपक्वता आणि नेतृत्वगुण दर्शवते. न्यूरो लिंग्विस्टिक प्रोग्रामिंग (NLP) तत्त्वांच्या माध्यमातून त्यांनी शब्दांची निवड, आवाजाचा स्वर आणि देहबोली यांचा व्यक्तिमत्व व संवादशैलीवर होणारा परिणाम स्पष्ट केला.

टीका वैयक्तिक पातळीवर न घेण्याचा सल्ला त्यांनी दिला. मजबूत आत्मविश्वास आणि शांत मानसिकता व्यक्तीला प्रत्येक परिस्थितीत संतुलित ठेवतात असे सांगितले.

# एल निनोच्या पार्श्वभूमीवर जलसंधारणाची कामे युद्धपातळीवर पूर्ण करा – मुख्यमंत्री

**मुंबई : हॅलो प्रभात**



## भूजल पातळी वाढविण्यासाठी कामे करण्याचे निर्देश

एल निनोच्या पार्श्वभूमीवर जलसंधारण तसेच जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गतची कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्यात यावीत. तसेच भूजल पातळी कमी झालेल्या ठिकाणी प्राधान्याने कामे करून तेथील भूजल पातळी वाढविण्यासाठी प्रयत्न करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी वर्षा या शासकीय निवासस्थानी मृद व जलसंधारण विभागाचा आढावा घेतला. यावेळी मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, मुख्यमंत्र्यांचे जल -विषयक सल्लागार श्रीराम वेदिरे, विशेष कार्य अधिकारी प्रिया खान, मृद व जलसंधारण आयुक्त अंजली रमेश, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजय देवराज आदी यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, एल निनोच्या पार्श्वभूमीवर भूजल पातळी वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी जलसंधारण, जलयुक्त शिवारमधील कामांचे प्राधान्य ठरवून ती पूर्ण करण्यात यावीत. तसेच जलयुक्त शिवार २.० अंतर्गत समाविष्ट गावांमध्ये दुरुस्तींच्या कामांची निकड पाहून ही कामे आराखड्यात समाविष्ट करून तातडीने पूर्ण करावीत. जलयुक्तमधील राज्यस्तरीय आराखडे १५ मे पूर्वी मंजूर करण्यात यावेत. तसेच जिल्ह्यांना सुधारित आराखडे देऊन कामांना गती द्यावी. जलयुक्त शिवारची कामे हाती घेतलेल्या गावांबाहेरील १० टक्के कामेही प्राधान्यक्रम ठरवून हाती घेण्यात यावीत. केंद्र शासनाच्या ‘विकसित भारत जी राम जी’ योजनेमध्ये जलसंधारणाच्या कामांवर भर देण्यात आला आहे. त्याचा लाभ घेऊन राज्यातील जलसंधारणाची कामे पूर्ण करून घ्यावीत. जलसंधारण कामाअंतर्गत नालाखोलीकरणची कामे करताना त्याठिकाणी पुन्हा गाळ होऊ नये, यासाठी नाल्याच्या ठिकाणी बांबू लागवड करण्याचा विचार करावा. विदर्भातील मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीची कामे जून महिन्यात पूर्ण करण्याचे नियोजन करावे. प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेअंतर्गत वाढीव निधी मिळण्यासाठी केंद्रीय मंत्री यांना स्वतः भेटणार असल्याचेही मुख्यमंत्री यांनी यावेळी सांगितले.

मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड म्हणाले की, मृद व जलसंधारण विभागाच्या आकृतीबंधाला मंजुरी मिळाल्याने आता कामास गती येईल. आतापर्यंत मंजुरी दिलेली कामे पूर्ण करण्यावर भर देण्यात येत आहे. तसेच मूळ आराखड्यानुसारच कामे पूर्ण व्हावीत यासाठी मार्गदर्शक सूचना तयार केल्या आहेत. मालगुजारी तलावांच्या ठिकाणी असलेली अतिक्रमणे काढण्याची परवानगी मिळावी. सचिव पापळकर यांनी सांगितले की, जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत विशेष निधी व अभिसरणअंतर्गत आतापर्यंत गाव आराखड्याप्रमाणे १ लाख ४४ हजार ६९७ कामे मंजूर झाली आहेत. त्यापैकी १ लाख १० हजार १२० कामे पूर्ण झाली आहेत. ऊर्वरित कामे प्रगतीपथावर असून लवकरात लवकर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.



## जुगार अड्ड्यावर खराडी पोलिसांचा छापा; पाच जणांवर गुन्हा दाखल

### तब्बल ४ लाखांहून अधिकचा मुद्देमाल हस्तगत

**वाघोली : हॅलो प्रभात**

खराडी परिसरात मध्यरात्री सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर खराडी पोलीस तपास पथकाने धाड टाकत पाच जणांना ताब्यात घेतले. या कारवाईत पोलिसांनी रोख रक्कम, मोबाईल फोन तसेच जुगाराचे साहित्य असा एकूण ४ लाख ३० हजार ३६० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

करीम खाजामिया मोमीन (वय २६ रा. खांदवेनगर, लोहगांव), प्रशांत श्रीकांत आव्हाळे (वय ४३ रा. आव्हाळवाडी ता, हवेली), अब्दुल जब्बाल लष्कर (वय ३८ चंदननगर, पुणे), दशरथ धानोजी वाघमारे (वय २७ वडगावशेरी, पुणे), जुगार अड्डा चालक रुषीकेश राजाराम अंधे (वय ३४ मांजरी, पुणे) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

खराडी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी (दि. ७ मे) रात्रीच्या सुमारास महालक्ष्मी लॉन्सजवळ काही इसम पैसे लावून '१३ पाणी' जुगार खेळत असल्याची खात्रीशीर माहिती तपास पथकाला मिळाली. त्यानुसार वरिष्ठ तपास पथकाने सापळा रचून पाच जणांना ताब्यात घेवून कारवाई केली. जुगार अड्ड्यावर पैशांची हारजित लावून जुगार खेळत असल्याचे तपासात निष्पन्न झाले. जुगार खेळण्यासाठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त केले. याप्रकरणी खराडी पोलिस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी पोलीस आयुक्त अमितेशकुमा, पोलीस सह आयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त मनोजकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त सोमय मुंडे, सहा. पोलीस आयुक्त नुतन पवार यांचे मार्गदर्शनाखाली खराडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, तपास पथकाचे प्रभारी अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक रविंद्र गोडसे, पोलीस उपनिरीक्षक गणेश घुले, पोलीस अंमलदार महेश नाणेकर, मनोज खरपुडे, सुरज जाधव, अशोक केदार, विलास केदारी, महेश बोराडे यांनी केली आहे.

**खराडी परिसरात कोणत्याही प्रकारचे अवैध धंदे, जुगार किंवा कायदा सुव्यवस्थेला बाधा आणणाऱ्या प्रकारांना अजिबात पाठीशी घातले जाणार नाही. नागरिकांनीही अशा प्रकारांची माहिती मिळाल्यास निर्भयपणे पोलिसांना द्यावी. अवैध व्यवसायांवर यापुढेही कठोर कारवाई सुरू राहील.**

**- संजय चव्हा, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,खराडी**

# घरट प्रकल्पातील अनाथांचे आरोग्य धोक्यात

### प्रकल्पाच्या आवारात मोकाट जनावरांचा बाजार ; अनाथ मुलांना न्याय देणार कोण?

**पुणे : हॅलो प्रभात**

सोमनाथ साळुंके



पालिकेच्या वतीने अनाथ मुलांच्या निवाऱ्यासाठी उभारण्यात आलेल्या घरट प्रकल्प निवारा केंद्र हे विविध समस्यांच्या विळख्यात अडकून परिसरात कचऱ्यासह मोकाट जनावरांचा वावर वाढल्याने येथील अनाथ मुलांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनून त्यांचे जीवनमान धोक्यात आले आहे.

आज समाजातील प्रत्येक व्यक्तीला अन्न,वस्त्र व निवारा याची मूलभूत गरजांची आवश्यकता जरी भासत असली तरी पण मुलांना त्यांचे भविष्य घडविण्यासाठी माता-पिता यांचे छत्र असणे आवश्यक आहे. पण आज समाजात असे अनेक बालक आहेत की,त्यांना आपले माता-पिता कोण?याची पुसटशी कल्पना नसल्याने शहरातच नव्हे तर देशाच्या कानाकोपऱ्यात असे अनेक बालक आहेत की,ते बहुतांश प्रमाणात अनाथ आहेत.त्यामुळे अशा बालकांना मायेची ऊब मिळावी व ते अनाथ राहू नये.या उद्देशाने पुणे महानगरपालिकेच्या वतीने दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत समाज विकास विभाग पालिका संचलित यांच्या संयुक्त विद्यमाने येरवडा येथील लक्ष्मीनगर झोपडपट्टी परिसरात घरट प्रकल्प निवारा केंद्र उभारण्यात आले आहे.

या अंतर्गत येथे जवळपास वीस अनाथ बालकांची पालिकेच्या वतीने सर्व व्यवस्था करण्यात आली आहे.मात्र बालकांची अन्न,वस्त्र व निवाऱ्याची सोय जरी करण्यात आली असली तरी पण पालिका अधिकाऱ्यांच्या भोंगळ व दुर्लक्षित कारभारामुळे प्रकल्पाच्या आवारात मोकाट जनावरांचा बाजार भरून कुत्रे,बोकड अशा प्राण्यांमुळे येथील बालकांना प्रकल्पाच्या बाहेर पडणे देखील कठीण झाले असतानाच परिसरातील काही नागरिक घरातील कचरा येथील आवारातच टाकत असल्याने परिसरात मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे साम्राज्य वाढले आहे.या ठिकाणी साफसफाई करण्यासाठी पालिकेचे कोणी ही सफाई कामगार फिरकत नसल्याने परिसरात डासांचे प्रमाण वाढून येथील मुलांना डेंग्यू,मलेरिया यासारख्या आजाराची लागण होते की,काय?याची धास्ती बालकांच्या मनाला लागून राहिली असून स्थानिक लोकप्रतिनिधींनी देखील त्याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. याबरोबरच साफसफाई करणारे कामगार हे कचरा गाडी येथील परिसरातच लावत असल्यामुळे त्यात आणखी भर पडून अनेक कचरा गाड्या ह्या धूळखात पडून असून अनेक लोखंडी कचरा गाड्या ह्या गंज लागलेल्या अवस्थेत पडून आहेत. गंज लागलेल्या कचरा गाड्यांमुळे एखाद्या बालकास खेळताना त्याचा धक्का लागला तरी पण यात तो जखमी होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने पालिकेचे अधिकारी हे बालकांच्या जीवाशी खेळत असल्याचे म्हणण्याची वेळ आली आहे.विशेष म्हणजे येथे पोलिस स्टेशन होण्यापूर्वी अनेक तळीराम हे परिसरात खुलेआमपणे दारू पिण्याचा आनंद मनसोक्तपणे घेत होते.मात्र पोलिस स्टेशन अधिकाऱ्यांच्या भीतीपोटी ते बंद झाले आहे.

पालिकेच्या वतीने असलेल्या इमारतीला आजपर्यंत कोणत्याही प्रकारची रंगरंगोटी करण्यात न आल्याने असलेली इमारत ही भूतबंगला आहे की,काय?अशी शंका नागरिकात निर्माण होऊन इमारतीच्या आवारात विद्युत केबलच्या जाळ्यांनी वेढा दिल्याने ती देखील बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीने धोकादायक बनून रात्रीच्या सुमारास परिसरात कोणत्याही प्रकारचे विद्युत दिवे बसविण्यात आल्याने हा परिसर अंधारात वातावरणात वेढला जात आहे. तर पालिकेचे अधिकारी निवारा प्रकल्प केंद्रास भेट देण्यास येत नसल्याने त्यांच्या कामकाजाबाबत शंका उपस्थित होत आहे.हे निवारा केंद्र जरी विविध समस्यांच्या विळख्यात अडकले असले तरी पण काही नागरिकांच्या दहशतीपुढे ते आवाज उठविण्याची धास्ती घेत आहे.

**अगोदरच माता_पित्याचे छत्र हरवलेले त्यात असलेल्या समस्येबाबत आवाज उठविण्याचा प्रयत्न केल्यास इतरांकडून निर्माण होणारी दहशत यामुळे अनेक बालक शांत बसण्यास पसंती देत असून परिसरात व्यावसायिकांच्या हातगाड्या,काहींच्या घरातील लाकडी कपाटे तर घराचे लोखंडी पत्रे या ठिकाणी सर्रासपणे आणून टाकण्यात येत आहे.त्यामुळे असलेला प्रकल्प हा व्यावसायिकांच्या साहित्याचे आगार बनले आहे.तरी अनाथ बालकांची मुख्य समस्या लक्षात घेऊन पालिका अधिकाऱ्यांनी संबंधित निवारा केंद्राकडे लक्ष केंद्रित करून परिसरात वाढलेल्या घाणीच्या साम्राज्यासह कचऱ्याची साफसफाई होण्याच्या मागणीला जोर धरला असून जेणे करून बालकांच्या आरोग्यास कोणत्याही प्रकारची काळजी राहणार नाही.याची पालिका अधिकाऱ्यांनी नोंद घेणे गरजेचे आहे.**




## ग्रामीण भागात आरोग्यसेवा पोहोचविणे हीच खरी राष्ट्रसेवा : संजय किर्लोस्कर

**लोणी : हॅलो प्रभात**

आरोग्यसेवेची खरी मोजदाद शहरांतील सुविधांवर ठरत नाही, तर ती सेवा समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत किती प्रभावीपणे पोहोचते यावर ठरते, असे प्रतिपादन किर्लोस्कर ब्रदर्स लि.चे अध्यक्ष संजय किर्लोस्कर यांनी केले. प्रवरा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस अभिमत विद्यापीठाच्या २०व्या पदवीप्रदान समारंभात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलपती डॉ. राजेंद्र विखे पाटील होते, तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. डॉ. सुरेश गोसावी विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

संजय किर्लोस्कर म्हणाले, ग्रामीण भारतात दर्जेदार शिक्षण आणि आरोग्यसेवा पोहोचविण्याचे कार्य पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील व पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या दूरदृष्टीचे फलित आहे. वैद्यकीय सेवा हे केवळ करिअर नसून मानवसेवेचे ईश्वरी कार्य असल्याचे त्यांनी सांगितले. तरुण डॉक्टरांनी आपल्या कारकिर्दीतील काही काळ ग्रामीण भागातील सेवेसाठी द्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. विशेष अतिथी डॉ. सुरेश गोसावी यांनी वैद्यकीय पदवी ही मानवतेप्रती आयुष्यभराची बांधिलकी असल्याचे नमूद केले. कुलपती डॉ. राजेंद्र विखे पाटील यांनी विद्यार्थ्यांमध्ये सेवा, प्रेम आणि करुणेची मूल्ये रुजविण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न असल्याचे सांगितले. समारंभात विविध शाखांतील एकूण ३२२ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. कार्यक्रमास विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पो.नि.रविंद्र कदमांच्या शिरपेचात मानाचा तुरा

**पुणे : हॅलो प्रभात**

गुन्हेगारांचे कर्दनकाळ ठरलेले व सिंघम या टोपण नावाने परिचित असलेले लक्ष्मीनगर पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रविंद्र कदम यांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा उभारला असून त्यांना नुकतेच इंडिया स्टार जीवन गौरव पुरस्काराने सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांच्यासह इतर मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



### इंडिया स्टार जीवन गौरव पुरस्काराने सन्मान

सातारा जिल्ह्यातील पुसेगावचे सुपुत्र असलेल्या पोलिस निरीक्षक रविंद्र कदम यांनी प्रथम तीस वर्षापूर्वी पोलिस उपनिरीक्षक म्हणून कार्यभार सांभाळत असताना राज्यातील विविध जिल्ह्यात काम करताना त्यांनी गुन्हेगारांवर वचक ठेवून दरारा निर्माण करून समाज बांधवांमध्ये आपल्या कामाचा ठसा उमटविला आहे.विशेष करून अनेक गंभीर गुन्ह्यातील गुन्हेगारांना त्यांची जागा दाखवून अनेक गुन्हेगार हे गेल्या काही वर्षापासून कारागृहात सजा भोगत आहे.त्यांचे पुण्यात काही वर्षापूर्वी आगमन होताच त्यांनी आपल्या कार्याचा ठसा आजपर्यंत जागृत ठेवला आहे.

विशेष करून साडेचार महिन्यापूर्वीच अवैध धंद्यासह गुन्हेगारांनी डोके वर काढलेल्या येरवडा भागातील लक्ष्मीनगर भागात नव्यानेच पोलिस स्टेशन उभारण्यात आल्यावर या ठिकाणी सर्वात प्रथम कदम यांची वर्णी लागून त्यांनी येथील कार्यभार हातात घेताच अवैध धंद्यासह त्यांनी गुन्हेगारांवर दरारा निर्माण करून अनेक गुन्हेगारास त्यांनी अनेक गुन्ह्यातील गंभीर आरोपींना तडीपार करण्यास मोलाची भूमिका बजावली आहे.हे करत असतानाच ते अनेक अनाथ वृद्ध महिला व नागरिकांचा सहारा बनून अशा कुटुंबांना मदतीचा हात पुढे केला आहे.यापूर्वी रात्री सात नंतर लक्ष्मीनगर भागात भाडे घेऊन येण्यास जे रिक्षाचालकामध्ये धास्ती निर्माण होत होती. तेच रिक्षाचालक कदम यांच्यावर विश्वास ठेवून परिसरात भाडे घेऊन येण्यास टाळत नाही. तर त्यांनी चोरट्यावर एवढ्या मोठ्या प्रमाणात वचक बसविला आहे की,अनेक चोरट्यांनी लक्ष्मीनगर सारख्या भागात चोरी करण्याची देखील धास्ती घेतली असून यापूर्वी ज्या लक्ष्मीनगर भागात विविध प्रकारचे गंभीर स्वरूपाचे गुन्हे घडत होते. त्यास सध्या आळा बसून रात्रीच्या सुमारास परिसरातील माता- भगिनी या शांततेत आराम करत आहेत.तर गुन्हेगारांचे कर्दनकाळ ठरणाऱ्या कदम यांनी परिसरात जरी दरारा निर्माण केला असला तरी पण हेच कदम हे चिमुकल्यांचे मामा,काका होण्याची भूमिका बजावत आहेत. ते गेल्या तीस वर्षाच्या काळात आपल्या खाकी वर्दीला कलंक लावून न देता जी भूमिका पार पाडत आहे. हेच त्यांचे उत्कृष्ट कार्य पाहून भविष्यात त्यांची इतरत्र बदली झाल्यास ती रोखण्यासाठी माता-भगिनींनी सह्यांची मोहीम राबविणार असल्याचे अनेक महिलांनी झालेल्या सत्कार समारंभात बोलून दाखविले आहे.

**सर्वसामान्य जनतेचे आधारस्तंभ बनलेले कदम यांचे उल्लेखनीय कार्य पाहून त्यांना लक्ष्मीनगर पोलिस स्टेशन अंतर्गत असणाऱ्या विविध संघटना,प्रतिष्ठानच्या वतीने पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.तर त्यांच्या कार्याची दखल घेत पोलिस निरीक्षक रविंद्र कदम यांना नुकतेच महाराष्ट्र व कामगार दिनाचे औचित्य साधून इंडिया स्टार झी गौरव पुरस्कार सोहळ्याने सन्मानित करण्यात आल्याने पोलिस खात्यासाठी ही अभिमानाची गोष्ट असून एकाच महिन्यात त्यांना चार पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.**

### थोडक्यात पण महत्वाचे




## गांधीनगर पाणी योजनेसाठी जनआक्रोश घागर मोर्चा

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

कोल्हापूर दक्षिण मतदारसंघातील १३ गावांच्या जिव्हाळ्याची गांधीनगर नळ पाणीपुरवठा योजनेच्या रखडलेल्या कामाविरोधात आज माजी आमदार ऋतुराज पाटील यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयावर घागर मोर्चा काढण्यात आला. राजकारणाच्या हेतूने पाणीपुरवठ्यासारख्या मूलभूत प्रश्नांमध्ये खोडा घालणाऱ्या महायुती सरकार आणि मेघा इंजिनियरिंगविरोधात १३ गावातील नागरिकांनी जोरदार आवाज उठवला. महिला भगिनींनी मेघा इंजिनीयरिंगच्या अधिकाऱ्यांना जाब विचारून तसेच जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरले. जून २०२७ पर्यंत काम पुर्ण करण्याचे लेखी आश्वासन मेघा कंपनीच्या अधिकाऱ्यांनी दिले. या मोर्चामध्ये जिल्हा परिषद सदस्य एकनाथ पाटील, सुदर्शन खोत, संग्राम पाटील, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष शशिकांत खोत, गोकुळचे माजी संचालक प्रकाश पाटील, बाबासाहेब चौगले, शशिकांत पाटील (चुयेकर), जिल्हा बँक संचालक स्मिता गवळी, पंचायत समिती सदस्य संदीप पाटील, शिल्पा हजारे, अनिता कांबळे, संगीता यादव, सरपंच उत्तम आंबवडे, मधुकर चव्हाण, निशांत पाटील, चंद्रकांत डावरे, ए व्ही कांबळे, प्रियंका पाटील, रूपाली कुसाळे, सुमन गुरव, शुभांगी अडसूळ, अश्विनी शिरगावे, राधिका खडके, जहीदा इनामदार, शैलजा भोसले, प्रताप चंदवानी, बाबासो माळी, आशिष पाटील, युवराज गवळी,सुनील शिंदे, अमर मोरे, अरुण पाटील टोपकर, विनोद हुजूरानी, कीर्ती मसुटे, रावसाहेब पाटील, सचिन देशमुख, महेश जाधव, सुदर्शन पाटील, के. डी. माने, नायकू बागणे, दत्ता भिलुगडे, संग्राम पोवाळकर, सतिश निर्मळ, ऋषिकेश हुन्नुरे आदींसह महिला व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बोरी पारधी ग्रामस्थांच्या उपोषणाला अखेर यश : महावितरण अधिकाऱ्याकडून समस्या सोडविण्याचे आश्वासन

**देऊळगाव गाडा : हॅलो प्रभात**



गेल्या काही दिवसापासून दौंड तालुक्यातील बोरी पारधी भागात सतत होणाऱ्या वीजपुरवठाखंडीतमुळे हैराण झालेल्या ग्रामस्थांनी महावितरण कार्यालय समोर तीन दिवसापासून सुरू केलेल्या उपोषणास बसलेल्या ग्रामस्थांची भेट घेऊन अधिकाऱ्यांनी असणाऱ्या समस्या सोडविण्याचे दिलेल्या आश्वासनामुळे ग्रामस्थांच्या या प्रयत्नांना यश आले. बोरी पारधी गावांमध्ये शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणात असून अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह हा शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नावरच अवलंबून आहे. मात्र गेल्या अनेक दिवसापासून महावितरण अधिकाऱ्यांच्या भोंगळ कारभारामुळे संध्याकाळच्या सुमारास तब्बल एक नव्हे तर चार ते पाच तास वीजपुरवठा खंडीत होत होता.त्यातच सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने शेतीतील पिकांना पाणी देणे गरजेचे आहे.मात्र होणाऱ्या खंडीत वीजपुरवठ्यामुळे पिके जळून जात शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत होते.त्यामुळे शेतातच काही पिकले नाही,तर खायचे काय?हा मुख्य प्रश्न अनेक शेतकऱ्यांना पडला असतानाच शेती करण्यासाठी अनेक शेतकऱ्यांनी खाजगी सावकार अथवा बँकेतून कर्ज घेतल्यामुळे बँकेचा हप्ता कसा फेडायचा हा मुख्य सवाल अनेकसमोर उभा राहिला होता. सध्या आजच्या परिस्थितीत मराठवाडा,विदर्भ अनेक ठिकाणी सावकार अथवा बँकेचे हप्ते फेडण्यास अपयश आल्याने दिवसेदिवस शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढत असल्याची वस्तुस्थिती असताना देखील महावितरण अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे अनेक शेतकऱ्यांना अधिकाऱ्यांच्या समोर नतमस्तक होण्याची वेळ आली होती.त्यातच उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे शेतकऱ्यांना रात्रीच्या सुमारास वीजपुरवठा रात्रीचा सुरळीत झाल्यावर नाईलाजास्तव रात्री_अपरात्री शेतीला पाणी देण्याची वेळ येत होती.तर वाढत्या उष्णतेमुळे नागरिक हैराण झाले होते.त्यामुळे परिसरातील वीजपुरवठा सुरळीत होण्याच्या दृष्टीने ग्रामस्थांच्या वतीने अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन निवेदन देण्यात येऊन देखील महावितरण अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांचे समस्या सोडविण्याऐवजी त्याकडे पाठ फिरवून केराची टोपली दाखविल्याने याविरोधात नागरिकात संताप व्यक्त करण्यात येत होता.

# राष्ट्रवादी पक्ष कार्यालयात महिलांसाठी स्मार्ट कार्ड शिबिर

### शिबिरास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**बारामती : हॅलो प्रभात**

महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भारतातील सर्वाधिक मताधिक्याने विजयी आमदार म्हणून निवड झाल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष बारामती शहराच्या वतीने महिलांसाठी विशेष एसटी स्मार्ट कार्ड शिबिराचे आयोजन (दि:८) रोजी करण्यात आले आहे. महिलांना सवलतीच्या दरात एसटी प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालय, शारदा प्रांगण येथे सुरू असलेल्या या शिबिराचे उद्घाटन बारामती नगरपरिषदेचे नगराध्यक्ष सचिन सातव तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष ॲड. किरण इंगळे यांच्या हस्ते संपन्न झाले. या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर युवक अध्यक्ष अभिजीत घाडगे, राष्ट्रवादी शहर पक्ष कार्यालयातील जनसंपर्क अधिकारी (पीआरओ) सुरज देवकाते, विद्यार्थी अध्यक्ष मेघराज माने, उपाध्यक्ष अन्सारभाई आत्तार, सुधीर पोद्दार, शैलेश वनवे,नवनाथ अपुणे, शब्बीरभाई शेख, अश्विनी तावरे, हेमल शहा, ॲड. रमेश कोकरे,योगेश पवार, सुभाष मोहिते यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. उपस्थित मान्यवरांनी महिलांसाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाची सुरुवात दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस अभिवादन करून करण्यात आली. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार पार्थ पवार तसेच युवा नेते जय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे ग्रामीण व शहरी भागातील महिला प्रवाशांना मोठा लाभ होणार असल्याचे सांगण्यात आले. शुक्रवार दि. ८ मे ते रविवार दि. १० मे २०२६ या कालावधीत सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत हे शिबिर सुरू राहणार आहे. या शिबिरामध्ये १२ वर्षांवरील प्रत्येक युवती व महिलांसाठी एनसीएमसी (NCMC) स्मार्ट कार्ड उपलब्ध करून देण्यात येत असून, एसटी प्रवासासाठी हे कार्ड अनिवार्य करण्यात आले आहे. महिलांना सवलतीच्या दरात हे कार्ड उपलब्ध करून देण्यात येत असून, कार्डासाठी केवळ १३० रुपये शुल्क आकारले जात आहे. विशेष म्हणजे हे कार्ड एकदाच काढायचे असून त्याला कोणतीही कालमर्यादा नसल्याने ते कायमस्वरूपी वैध राहणार आहे.



कार्ड काढण्यासाठी महिलांनी आधार कार्ड सोबत आणणे तसेच स्वतः उपस्थित राहणे आवश्यक असल्याची माहिती शहराध्यक्ष ॲड. किरण इंगळे यांनी दिली. या उपक्रमामुळे महिलांना एसटी प्रवास अधिक सुलभ होणार असून शासनाच्या सवलतींचा थेट लाभ मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालय, शारदा प्रांगण येथे महिलांसाठी आयोजित करण्यात आलेले विशेष एसटी स्मार्ट कार्ड शिबिर शुक्रवार दि. ८ मे ते रविवार दि. १० मे २०२६ या कालावधीत सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. १२ वर्षांवरील प्रत्येक युवती व महिलांसाठी एनसीएमसी (NCMC) स्मार्ट कार्ड उपलब्ध करून देण्यात येत असून, कार्डासाठी केवळ १३० रुपये शुल्क आकारले जात आहे.

कार्ड काढण्यासाठी आधार कार्ड सोबत आणणे तसेच संबंधित महिलांनी स्वतः उपस्थित राहणे आवश्यक असल्याचे आवाहन बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष ॲड.किरण इंगळे यांनी केले आहे.